

शिरडीतील दहीहंडी

सप्टेंबर ] कि. १ रु. [ १९८

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाई वाक्सुधा

फेडनि देहमायेची बुंथी ।
संत सृष्टीमाजी अवतरती ।
होता उद्धार–कार्यपूर्ती ।
तात्काळ समरसती अव्यक्तीं ॥१४३॥

नट धरितो वेष नाना ।
अंतरीं पूर्ण जाणे आपणा ।
तया अवतारिया परिपूर्णा ।
सांकडें मरणाचें तें काय ॥१४४॥

लोक संग्रहार्थ जो अवतरला ।
कार्य संपतां अवतार संपविला ।
तो काय जन्म–मरणाच्या अंकिला ।
विग्रह स्वलीला धरितो जो ॥१४५॥

परब्रह्म ज्याचें वैभव ।
तया कैंचा निधन संभव ।
निर्ममत्व जयाचा अनुभव ।
कैंचा भवाभव त्या बाधी ॥१४६॥

दिसला जरी कर्मी प्रवृत्त ।
कधीं न कर्मे केली यत्किंचित ।
सदा कर्मी अकर्म देखत ।
अहंकार रहितत्वें ॥१४७॥

–श्रीसाईसच्चरित–अध्याय ४२ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५९ वे] सप्टेंबर १९८० [अं. ६



: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी „ )



वार्षिक वर्गणी रु. १०–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक १ रु. फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका–सप्टेंबर १९८०


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | — शिरडी–शिरोधार्य आश्वास्थान |
| २) | न्यायमूर्ती श्री काझीसाहेबांचे स्वागत | — सदानंद चेंदवणकर |
| ३) | परमहंस श्रीपुंडलिक महाराज | — श्री. बाबा धांडे |
| ४) | मूर्तिजापूर | — |
| ५) | दर्शन द्या | — राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| ६) | पुंडलिका भेटी आले परब्रह्म | — — |
| ७) | पुंडलिकाच्या कृपेची अशीही पाखरण | — श्री. पंढरीदास महाराज |
| ८) | घणघणतो घंटानाद | — श्री. श्रीराम आठवले |
| ९) | संत गाडगे महाराजांची वाणी | — श्री. नारायण पातोंड |
| १०) | तुझी तिजोरी उघडून पहा | — श्री. उत्तमराव रंगोले |
| ११) | हे साई | — कु. सुलोचना गुरु गोदावरी |
| १२) | श्रीमारोती महाराज व परमहंस | — श्री. रामकृष्ण कडू |
| १३) | मन पाखरू | — लीला मराठे |
| १४) | अनसूया मातेवर बाबांची कृपा | — डॉ. प्रकाश चोपडे |
| १५) | श्रीपुंडलिक महाराजांची आरती | — — |
| १६) | श्रीगुरु चरित्रातील मंदमती ब्राम्हणपुत्र | — प्रा. र. श्री. पुजारी |
| १७) | इंडियाचा साधू म्हणूनी | — श्री. नारायण पातोंड |
| १८) | श्रीसाईबाबा अष्टोत्तर शतनामावली | — श्री. मु. ब. निंबाळकर |
| १९) | तुमचे साईविषयक सामान्यज्ञान किती आहे | — श्री. माधव गोरे |
| २०) | शिरडीचे नवे अत्याधुनिक भोजनगृह | — — |
| २१) | मी साईभक्त कसा झालो | — श्री. मानसिंगराव फडतरे |
| २२) | जात्यावर दळतानाच्या श्रीसाई ओव्या | — सौ. उषा मुळे |
| २३) | साईनाथ देवा | — सौ. तारा चेंदवणकर |
| २४) | चराचरी भरूनी उरला | — श्री. विजय हजारे |
| २५) | ती उदी – (अंगारा) | — श्री. स. मा. मुऱ्हार |
| २६) | आरती शिरडीपतीची | — सौ. वैशाली हिंदळेकर |
| २७) | श्रीसाई गीत तुषार | — श्री. सुहास देसाई |
| २८) | श्रीसाई कृपा | — डॉ. ग. स. कामत |
| २९) | असे हे शिरडी साईनाथ | — श्री. अरुण खडक्रीकर |
| ३०) | श्रीसाई परिवार वृत्त विशेष | — — |
| ३१) | शिरडीचे साईबाबा चित्रपट परीक्षण | — डॉ. अ. का. पाठक |
| ३२) | शिरडी वृत्त | — जुलै १९८० |


☆ ☆ ☆

संपादकीय —

स. न. वि. वि.

•श्रीसाईबाबांची शिरडी

# शिरोधार्य आशास्थान

पंढरपूर–भारताचे परमपवित्र पूज्य स्थान आहे, तसे शिरडी हे श्रीसाईबाबांचे पूज्य स्थान आहे.

आपल्या संतांनीच भागवत धर्म वाढविला. भागवत धर्माची दीक्षा घेऊन श्रीज्ञानेश्वर महाराजांनी त्याची ज्योत सर्वत्र पेटविली. त्या अमरज्योतीच्या प्रकाशात महाराष्ट्र उजळून निघाला आहे. लोक अधिक श्रद्धाळू बनत चालले आणि धर्म–अधर्माची कांस सावरली गेली.

महाराष्ट्र पराक्रमी आहेच, पण तो परमेश्वरनिष्ठही आहे, हे श्रीसाईबाबांसारख्या देवपुरुषांनी वारंवार सिद्ध केले आहे.

नास्तिकास आस्तिक करण्याचे सामर्थ्य केवळ साईबाबा या नावात आहे. नास्तिकहि साईबाबांचे महात्म्य जाणून आहेत, म्हणूनच मनातल्या मनात श्रीसाईबाबांच्या नावाची मालिका जपू लागतात.

श्रीसाईबाबांच्या पूज्य स्मृतीस महाराष्ट्राने सतत जागृत ठेवले आहे. त्यांचा लौकिक मात्र केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून तामीळनाडूपर्यंत त्यांचा कीर्तीसुगंध दरवळत आहे. साईबाबांना हे महात्म्य त्यांच्या हयातीत जितके लाभले नाही, तितके ते समाधिस्त झाल्यानंतर त्यांना लाभले हे विशेष होय.

कारण, ज्यांनी आपल्या हयातींत भोंदूगिरी चालविली व राजविलासाचे सुख अनुभविले, असे दांभिक देवभक्त याच महाराष्ट्रात काही थोडेथोडके झाले नाहीत.

साईबाबांविषयी जे काही लिहावयाचे असेल, ते आदराने मान खाली घालूनच लिहावे लागते, भक्तिभावाने लिहावे लागते, श्रद्धेने लिहावे लागते लीनतेने लिहावे लागते.

त्यांची थोरवीच तशी आहे.

श्रीसाईबाबा आज हयात नाहीत, पण शुक्लेदुंप्रमाणे त्यांची कीर्तीप्रभा मात्र वाढत चालली आहे. दरवर्षी त्यांच्या चाहत्यात, भक्तगणात अधिक भर पडत चालली आहे.

अस्वास्थ्यतेच्या काळात मनाला शांति देणारे, चित्त:शांति मिळवून देणारे जे काही आशेचे किरण जगात वावरत आहेत, त्यातच साईबाबांच्या नामस्मरणाचा उल्लेख करावा लागेल. अनेक अशांत जीवाला साईबाबांवरील निष्ठेने, भक्तीने शांत केले आहे. अनेक हृदयात उडालेला हलकल्लोळ साईनाथांच्या नित्य नामस्मरणाने थामलेला आहे. अनेकांच्या निराशमय जीवनात आशेची फुंकर घालण्याचे सामर्थ्य साईबाबांच्या वंदनीय नावाला लाभले आहे.

पाश्चात्य समाज हा भोगवादी आहे, रंगेल मनोवृत्तीचा आहे; पण भारतीय संस्कृति आत्मनिष्ठ आहे. आत्मशांति म्हणून जी काही चीज आहे, ती भारतीयातच आढळून येते, असे पाश्चात्य सुज्ञांचेहि मत आहे. सॉमरसेट मॉम या लेखकाचेच उदाहरण घ्या. त्याने लिहिलेल्या आणि जगात गाजलेल्या 'दि रेझर्स एज' या कादंबरीतील नायक हा पहिल्या महायुद्धाने बेचैन झालेला असतो. जगातील जे सत्य आणि सुंदर आहे, त्याचा तो साकल्याने विचार करू शकत नाही. त्याचा बेचैन आत्मा सुखाच्या शोधात आहे. हवे ते सुख मिळविण्याकरिता, आत्मशांतीची तहान भागविण्याकरिता अखेर तो भटकत भटकत भारतात येतो आणि अखेर त्याला हवे असलेले सुख हिमालयात एका साधूच्या सान्निध्यात सापडते.

आज अशा अनेक बेचैन, त्रासलेल्या, गांजलेल्या जीवास शिरडीत अखेर सुखाची सावली सापडली आहे. शिरडीच्या आश्रमात जाऊन आले की, साईबाबा प्रसन्न होतात, ही भावना आज सर्वत्र बळावत चालली आहे. एवढेच नव्हे, तर साईबाबांच्या नावे तयार केलेल्या अंगठ्या आणि ताईत वगैरे लोक आस्थेने जवळ बाळगू लागले आहेत.

त्यांच्या भक्तवर्गात समाजातील सर्व थरातील सर्व जातीचे लोक आहेत. साईबाबा हिंदु की मुसलमान, हे विसरून लोक आज त्यांच्या समाधीच्या दर्शनार्थ शिरडीला धावू लागले आहेत. चित्रपट व्यवसायातील लोकांचा भरणा अधिक प्रमाणात आहे सी. रामचंद्र, मनोजकुमार आदि प्रमुख कलावंत मंडळी त्यांचे भक्त आहेत. साईबाबांवर अनेक चित्रपट व नाटके सुरू झाली आहेत.

साईबाबांचे महत्व प्रतिदिनी वाढत चालले आहे पण याची यापुढे बुवाबाजी मात्र होता कामा नये. साईबाबा विषयीचे सर्व वाद श्रीसाईबाबांच्या श्रेष्ठत्वाला कमीपणा आणणारे आहेत, याची त्यांच्या भक्तगणांनी जाणीव राखावयास हवी. कारण, आज असंख्य लोकांना जे मानसिक समाधान मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य शिरडी संस्थान आणि साईबाबांची पूज्यस्मृति करून देत आहे, ते नष्ट होईल हे त्यांच्या भक्तांनी आणि आश्रमीय लोकांनी लक्षात ठेवावे.

कारण, साईबाबांची शिरडी ही आज शिरोधार्य आशास्थान आहे हे मी सांगावयास पाहिजे काय ?

★


## श्रीसाईलीला

**भव्य दिवाळी अंक १९८०**

श्रीसाईबाबांचे भक्त आज जगभर पसरलेले आहेत. त्या भक्तांना श्रीबाबांचे विविध अनुभव आजही येत आहेत. संकटकाळी अडी अडचणीच्या वेळी भक्तांनी श्रीबाबांना आवर्जून हाक मारली रे मारली की बाबा संकट निवारणार्थ खात्रीने धावून येतातच अशी बाबांच्या भक्तांची अनुभव प्रचिती आहे. भक्तांनी लिहिलेल्या बाबांच्या विषयीच्या अशा विविध चित्तथरारक अनुभवांनी भरगच्च असा अंक—

**श्रीसाईलीला भक्त अनुभव विशेषांक**

१ नव्हेंबर १९८० रोजी थाटात प्रकाशित होत आहे.

पृष्ठे ११२ किंमत २ रु.

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे मोहक रंगीन चित्र

# न्यायमूर्ती श्री. काझीसाहेबांचे स्वागत

— सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचा कारभार इ. सन १९६० सालापासून महाराष्ट्र राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली सिटी सिव्हिल कोर्ट यांचे मार्फत चालू आहे. या सिटी सिव्हिल कोर्टाचे न्यायमूर्ती यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानचे कोर्ट रिसिव्हर आजतागायत काम पहात आहेत. १९६८ सालापासून १९७९ साल अखेर सिटी सिव्हिल कोर्टाचे लोकप्रिय न्यायमूर्ती श्री. एन्. के. पारेख साहेब श्री साईबाबा संस्थानच्या एकंदरीत कारभाराकडे जातीने लक्ष देऊन वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन संस्थानच्या न्यायालयधारकांना ( कोर्टरिसिव्हर ) देत होते पण त्यांची नेमणूक मुंबई उच्च न्यायालयात झाल्याने त्यांचे जागी न्या. श्री. म. स. रत्नपारखी यांची नेमणूक करण्यात आली पण थोड्याच दिवसात त्यांना बढती मिळाल्याने त्यांचे जागी न्या. श्री. ए. ए. काझीसाहेब यांची नेमणूक करण्यात आली व ओघानेच त्यामुळे त्यांचेकडे संस्थानचे कामकाज पण आले आहे.

नूतन मार्गदर्शक व सल्लागार श्री. अली अब्दुल करीम काझी साहेब यांचा जन्म पुणे येथे १४ ऑगस्ट १९३१ रोजी झाला. त्यांचे अब्बाजान अब्दुल करीम काझीसाहेब महाराष्ट्र राज्य सरकारचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ अॅग्रीकल्चर या या पदावर होते. ते १९६८ साली पैगंबर वासी झाले.

अलीसाहेबांचे प्रा. शिक्षण पुणे येथे झाले. दुय्यम शिक्षण जुनागड येथे झाले. तेथूनच ते मॅट्रिकची परीक्षा १९४८ साली उत्तीर्ण झाले पुढे पुण्याच्या नौरोसजी वाडिया कॉलेजात त्यांनी उच्च शिक्षणासाठी प्रवेश केला. १९५२ साली ते बी. ए. पदवीधर व १९५४ साली पुणे-लॉ कॉलेजातून अभ्यास करून एल. एल. बी वकील झाले, व पुढे मुंबईहून एल. एल. एम. ही वकीलीतील मास्टरची पदवी त्यांनी मिळविली.

वकीलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काझी साहेबांनी पुण्याला आपली वकीली १९५४ साली सुरू केली चांगली १३-१४ वर्षे त्यांनी अनुभव व नावलौकीक मिळविला

१९६८ साली त्यांची नेमणूक मुंबईतील स्मॉलकॉजेस कोर्टात न्यायाधीश म्हणून करण्यात आली १९७५ साली ते तिथे मुख्य न्यायाधिश झाले. १९७६ साली त्यांची नेमणूक सरकारने सिटीसिव्हिल व सेशन्स कोर्टात केली व ते तिथे न्यायमूर्ती म्हणून वावरू लागले. या एवढ्या जबाबदारीवर असताना वर्षभर ते लॉ कॉलेजात मुस्लिम लॉ या विषयाचे लेक्चरर म्हणूनही वावरले होते.

स्वभावाने अली साहेब दिलखुलास वृत्तीचे असून गप्पा मारण्याचा त्यांना शौक आहे. त्यांचे व्यक्तिमत्व रूबाबदार आहे. ते धार्मिक मनोवृत्तीचे व नम्र स्वभावाचे सद्गृहस्थ आहेत. आपल्या फावल्या वेळात वाचनाचा त्यांना छंद असून मानसशास्त्रीय विषयाची पुस्तके त्याना वाचावयास विशेष आवडतात. त्यांचा विवाह १९६२ साली झाला. त्यांच्या पत्नी कमरून्निसा साहिबा या लाला घराण्यातल्या सुशिक्षित आहेत. त्यांचे वडील एफ. एच. लाला हे जिल्हा न्यायाधिश व इंडस्ट्रियल ट्रिब्युनलचे एक सभासद होते. काझी साहेबांना गझाल व अशील नावाचे दोन पुत्र व सबरम नावाची कन्या आहे. काझी साहेबांचे मोठे बंधू श्री. हसनभाई हे पुण्याला वकील असुन धाकटे बंधू श्री. इकबाल भाई हे सौदी अरेबियात सिव्हिल इंजिनियर आहेत.

न्यायमूर्ती श्री. काझी साहेबांनी आपली नवी अधिकार ग्रहणाची सूत्रे आता हाती घेतली आहेत. संस्थानच्या कामकाजात ते जातीने लक्ष घालीत आहेत. श्रीसाईबाबांसारख्या एका जगप्रसिद्ध संताची अगदी जवळून सेवा करण्याची संधी त्यांना लाभत आहे. त्यांच्याच कारकिर्दीत संस्थानच्या नूतन भोजनगृहाची पण सुरुवात झाली आहे. तेव्हा श्रीसाईबाबा संस्थानतर्फे न्या. काझी साहेबांचे स्वागत करतो व संस्थानच्या विकास कार्यात त्यांनी अधिकाधिक लक्ष घालून श्रीबाबांची सेवा करण्याची चालून आलेली संधी सार्थकी लावावी अशी प्रार्थना करतो.

# परमहंस श्री पुंडलिक महाराज



जय जय सद्‌गुरु पुंडलिका । देई तव प्रेम प्रभो ।
गोरेगावी देहि विदेही । ध्यानी मनी भगवान ।
मुंगसाजी सद्‌गुरु कृपेने । ब्रह्म स्वरूपी रममाण ।
थोर तुझा महिमा गुरुराया । सर्व सुखाचे धाम ।
अंत न लागे सामर्थ्याचा । व्यापक आत्माराम ।

मूर्तिजापूरची दिव्य विभूती

# परमहंस श्री पुंडलिक महाराज

श्री. बाबा धांडे, दुर्गापूर,

एके दिवशी श्री. नानांनीं बाहेर जाताना घराचे दार ओढून घेतले. दाराच्या फटीत बाबांची चारही बोटे चेंगरली. नाना बाहेरून येऊन दार उघडून पहातात तो बाबांच्या डोळयात अश्रूचा टिपूसही नव्हता व चेहऱ्यावर दुःखाची छायाही नव्हती. मुखकमलावर ब्रह्मानंद विलसत होता......

---

● भगवान परमहंस पुंडलिक बाबा यांचा जन्म गोरेगाव ता. जि. अकोला येथे चैत्र शुद्ध पंचमी शके १८६४ दि. १० एप्रिल १९३२ मध्ये रविवारी रात्री प्रथम प्रहरी रोहिणी नक्षत्रावर पिता खंडूजी व माता मंजुळाबाई या भक्तिमान दांपत्याच्या पोटी धनगर जातीत झाला. श्री बाबांच्या जन्मकाळी एका भल्या मोठ्या नागाने घराच्या वळचणीवर बसून भिंतीवर दुग्धारा सोडल्या, नंतर तो नाग गुप्त झाला. भक्त 'पुंडलिक' नाटक गावामध्ये रंगमंचकावर चालू होते. नाटकाच्या मुहूर्तावरच श्री बाबांचे नाव 'पुंडलिक' ठेवण्यात आले.

नाटकात श्री. नानांचा (बाबांच्या वडीलांचा) अभिनय चालू असताना एका जटाधारी योग्याने रंगमंचकावर जाऊन श्री. नानांना पुत्रजन्माची वार्ता सांगितली, आणि पुढे सांगितले की, मी माझ्या दिसण्यास सुंदर असा आरसारुपी पुत्र तुला दिला आहे, त्याचा सांभाळ कर.

वयाच्या सात वर्षेपर्यंत बाबा बोलले नाहीत. पिंपळोदचे योगीराज श्रीपरशराम-बाबा गोरेगावाला आले असताना उभयतांचा मूक संवाद झाला. नंतर बाबा एकेरी शब्दाने अस्पष्टपणे बोबडे बोल 'गोविंद राधे' असे बोलू लागले.

बाबा एके दिवशी दारात खेळत असताना त्यांना साप दिसला. बाबांनी त्याला पकडून त्यांच्या अंगाचीच त्याला गाठ दिली व त्याला बसवून ते त्याच्याशी खेळू लागले. गावच्या काही लोकांना हा साप दिसला असताना त्यांनी तो मारला. बाबा 'साप मरणाच्या भीतीतून वाचला हो' असे म्हणत साप जेथे फेकून दिला होता तेथे गेले व त्याला तोंडात धरून आंब्याप्रमाणे चोखू लागले. सौ. मंजुळा आईनी बाबांच्या हातात मेलेला साप पहाताच घाबरून धावत जाऊन त्या सापास फेकून दिले.

वयाच्या नवव्या वर्षी बाबा गोविंद साधुबरोबर कुरणखेड गावी गेले. तेथे यशवंत माळ्याच्या मुलाला जीवंत केले व दिव्यातील तेल संपल्यावर त्यात पाणी टाकून बाबांनी पाण्यावर दिवा रात्रभर जाळला.

एके दिवशी श्री. नानांनी बाहेर जाताना घराचे दार ओढून घेतले. दाराच्या फटीत बाबांची चारहि बोटे चेंगरली. नाना बाहेरून येऊन दार उघडून पहातात तो बाबांच्या डोळयात अश्रूचा टिपूसही नव्हता व चेहऱ्यावर दुःखाची छायाही नव्हती. मुख कमलावर ब्रह्मानंद विलसत होता. पुढे कुटासा येथे गेले असताना तेथील तळयात ते वेळी अवेळी पोहत व बुडी मारून बराच वेळ तळयात रहात. एकदा राधाकिसन नावाचे श्रीगाडगेमहाराजांचे शिष्य यांचे कुटाशाला कीर्तन होते. बुवा असेच तळयाकडे गेले असताना गौरकाय सुस्वरूप बाबांची लहानशी मूर्ती त्यांच्यासमोर तळयाच्या काठातून उभी राहिली व त्यांना "आमचे पाय धुवा धुवा, आम्ही कृष्ण आहो बुवा" म्हणू लागले. राधाकिसन महाराजांनी बाबांचे चरण कमल धुतले व साष्टांग दंडवत घातले. त्याच कुटासा गावी एक कच्छी रहात होता. त्याचे किराणा मालाचे दुकान होते दुकानासमोर त्याने एके दिवशी मिरच्या वाळू घातल्या होत्या बाबा त्या मिरच्यावरून नाचत गेले म्हणून कच्छी रागाने लालबुंद झाला. त्याने बाबांना मिरचीच्या पोत्यात रात्रभर कोंडून ठेवले. पण बाबांची पोत्यात आनंद समाधी लागली होती. याच गावात काही दुष्टांनी बाबा नागवे रहात म्हणून त्यांच्या पाठी पोटाला बिबा ठेचून लावला. बिबा चिघळला. पण बाबा त्यावर औषधोपचार करून घेईनात शेवटी बिब्याचे फोड औषधाशिवायच बसले.

या गावच्या कलावतीबाई टाकोणकार या भोळ्या व अक्षरशत्रूबाईवर तिची भक्ती पाहून बाबांनी कृपा केली. निरक्षरबाई ज्ञानेश्वरी वाचू लागली व पंढरपूरला चातुर्मास करू लागली. ही बाई एकलारा गावी ब्रह्मलीन झाली.

कुटाशावरून दोन वर्षांनंतर बाबा गोरेगावला आले. धामणगावच्या मुंगसाजी महाराजांची कीर्ती ऐकून नाना बाबांना धामणगावला घेवून गेले. त्या रात्री नानांना स्वप्न पडले. एक सुंदर जीन चढवलेला अश्व नानानी स्वप्नात पाहिला. बाबा त्यावर बसून मुंगसाजी महाराजांकडे जात होते.

मुन्गसाजी महाराजांनी बाबांची ओळख करून दिली व म्हणाले, 'हा देव आहे रे, हे रत्न आहे. याचा सांभाळ कर.' मुंगसाजी महाराजांनी त्यांचा आज्ञाधारक भक्त घाडगे यांचेकरवी मंगलस्नान घातले व नवीन कफनी वगैरे चढवून बाबांना गादीवर बसविले. त्यानंतर मुन्गसाजी महाराजांनी मुंबईला प्रयाण केले. तेथे नवीन महालात त्यांनी १९५८ मध्ये समाधी घेतली.

बाबा घामणगावला पाच-सहा महिने राहिल्यानंतर गोरेगावला परत आले. १९४७ चैत्र शुद्ध पंचमीला श्री बाबांची न भूतो न भविष्यती अशी यात्रा भरली व बाबांची कीर्ती चहू दिशेने कस्तुरीच्या सुगंधाप्रमाणे पसरू लागली. दर्शनाकरता लांबून दूरदूरचे लोक येवू लागले. गोरेगावला दररोजची यात्रा भरू लागली. गोरेगाव पंढरपूरसारखे दुमदुमु लागले. लोक काटेपूर्णा नदीवर चंद्रभागेचे स्नान करू लागले.

श्रीबाबांची १५ वर्षाची गोजिरी मूर्ति गोरेगाव पुण्यक्षेत्रामध्ये आपल्या अवतार-लीलानी खेळू लागली. हजारो लोकांना चमत्कार होऊ लागले, अनुभव येवू लागले. बाबांचा भक्तगण वाढू लागला तसतसा श्री बाबांचा गौरव व वैभव सूर्यनारायणाच्या तेजालाही फिक्के पाडू लागले. महाराष्ट्राचे देव्हाऱ्यात श्रीबाबांची पूजा होऊ लागली.

चिखली मुक्कामी वाशिमचे सरकारी नोकरीत असलेले गोडावून सुपरवायझर श्री. अनंतराव पारदकर हे दर्शनास आले असताना बाबांनी त्यांना फुलं फेकून मारले त्याबरोबर पारदकर मूर्च्छीत पडले. बाबांनी त्यांना चिन्मय साक्षात्कार घडविला. पुढे पारदकरांनी नोकरीचा राजीनामा दिला व संन्यास घेतला.

चिखलीवरून वाशिम तालुक्यातील काटेपूर्णा नदीचे जे उगमस्थान त्या काटा गावाला बाबांनी प्रयाण केले. तेथील श्रीमंत सद्‌भक्त शिवराम बापू उर्फ काटेकर दादा यांचेकडे बाबा बरेच दिवस राहिले व तेथे लोकांना बाबांनी अनेक अनुभव दिले.

त्यानंतर बाबा दानापूरला श्रीमंत भिकाजी पाटलांकडे राहत होते. बाबांच्या कृपेने श्रीमंत भिकाजी पाटलांना पुत्रलाभ झाला. बाबांनी श्री. आत्मारामजी नहाटे यांचे मुलीला भयंकर आजारातून वाचविले. बाबांचे भक्त ज्ञानदेव पाटील उर्फ दादा यांचेकडेही राजना, ता. चांदूर, जि. अमरावती येथे राहिले. दादांनी बाबांच्या सेवेत तनमन–धनाने सहयोग दिला.

बाबा पुन्हा गोरेगावला येऊन राहू लागले. बाबांचा दररोजचा दरबार भरू लागला. दुःखी पीडीत, गरीब, कामनार्थी लोकांची कामे होऊ लागली. लोकांना अनुभव येत गेल्यामुळे दररोजची यात्रा वाढू लागली. त्यावेळी बाबा त्यांच्या स्वतःच्या जुन्या घरात होते.

एके दिवशी मूर्तिजापूरचे विठ्ठलराव जमादार बाबांना आपल्याकडे घेऊन गेले. तेथे त्यांनी बाबांच्या उपस्थितीमध्ये अन्नदानाचा वगैरे भव्य कार्यक्रम केला. कार्यक्रम

झाल्यानंतर बाबांनी राधाकिसन महाराजांचे बोट धरून बाहेर नेले व त्यांना म्हणतात ' बाबा आपण मुंबईला जाऊ ! मुंगसाजी महाराजांच्या भेटीला जाऊ बुवा ! ' राधाकिसन महाराज विस्मयचकित झाले. बाबा म्हणतात, मुंबईला चला- आपल्याजवळ तर ३॥ रुपयेच आहेत. राधाकिसन महाराज बाबांना म्हणतात बाबा माझेजवळ तर साडेतीन रुपयेच आहेत मग मुंबईला कसे चलता ? मी करतो ना बुवा सोय, तुम्ही घाबरू नका, मी आहे ना तुमच्या सोबत, विश्वास ठेवा बुवा. ' बाबा म्हणाले.

राधाकिसन बुवाने हिंमत धरली व ते सोबतच्या लोकांच्या पश्चात् नागपूर-मुंबई एक्सप्रेसने मुंबईकडे रवाना होण्यासाठी स्टेशनवर आले. स्टेशनवर एक मारवाडी आपला नवस फेडण्यासाठी श्री बाबांकडे गोरेगावला जाण्याकरता काटेपूर्णाचे तिकीट काढण्यास आला होता. त्यांच्या सुदैवाने बाबा त्याला स्टेशनवरच दिसल्यामुळे त्याने १३० रुपये दक्षिणा बाबांना स्टेशनवर पूजा करून अर्पण केली. राधाकिसन महाराजांनी याच पैशातून मुंबईची तिकिटे काढली. बुवा मधल्या स्टेशनवर उतरले. कारण बुवांना वाटले, आपल्या मागे पोलीस न लागोत ! खंडू नानांनी पोलीसमध्ये रिपोर्ट केला असेल तर आपले काही बरे नाही. त्यांना बाबांच्या बोलण्याचा धीर वाटे, त्यांनी बाबांवर पूर्ण विश्वास ठेवला होता.

राधाकिसनबुवा बाबांना घेऊन नाशिकच्या स्टेशनवर उतरले व तेथून ते खेड्यात गेले. तेथे बाबांना बघून लोकांची भयंकर गर्दी झाली. राधाकिसन बुवाजवळ दोनशे-तीनशे रुपये दक्षिणाही जमा झाली लोकांनी बाबांना घरी नेऊन मंगलस्नान घातले व कीर्तनादि कार्यक्रम झाले. जुन्नर, सिन्नर वगैरे भाग हिंडून बाबा मुंबईला पोचले. तेथे खंडू नाना वगैरे मंडळीची मुंगसाजी महाराजांकडे पुन्हा भेट झाली. खंडूनाना राधाकिसन महाराजांवर गरम झाले. पण नंतर राधाकिसन बुवाने साद्यंत सर्व वृत्तांत सांगितल्यानंतर त्यांचा राग शांत झाला व ही सर्व मंडळी मुंगसाजी महाराजांचे दर्शन घेऊन गोरेगावला आली, व सर्व मुंबईचा प्रवास आटोपून आल्यानंतर राधाकिसन पैशाचा हिशोब करतात तेव्हा त्यांना आपल्याजवळ ३॥ रुपये उरल्याचे दिसले. चारशे-पाचशे दक्षिणा आल्यानंतर सर्व जाऊन जवळ जवळ होते तितके पैसे उरावे हा त्यांना बाबांचा चमत्कार वाटला, कारण बाबा त्यांना म्हणाले होते की मी सर्व खर्च करतो बुवा, तुम्ही विश्वास ठेवा.

१९५६ साली जळगावची प्रसिद्ध कलावंतीण श्रीमती कमलाबाई चंदनकर हिने ४००० रुपये बाबांचे मंदिर बांधण्याकरिता दिले. बाबा नंतर त्या मंदिरात राहण्यास आले. बाबांच्या सेवेसाठी भक्तलोक स्वयंस्फूर्तीने येऊ लागले व ते बाबांच्या

सेवेत धन्यता मानू लागले. एका नंतर एक याप्रमाणे बाबांच्या सेवेत भक्तवृन्द येत-जात असत व बाबांची सेवा अहोरात्र चालत असे. बाबांना जेवू घालणे, कफनी चढविणे, बाबांना स्नान घालणे, आश्रमाची झाडलोट इत्यादी सेवेची कामे भक्त-मंडळी करू लागली.

बाबांची कीर्ति व लौकीक वाढत चालला तसतसा बाबांच्या परगावी दर्शन सोहळयाचे कार्यक्रमासाठी तारखा सुरू झाल्या. भक्तमंडळी बाबांचे चरणस्पर्श आपल्या घराला लागावे म्हणून चालक मंडळीकडे विनवण्या करू लागले.

बाबांचे धाकटे बंधू श्री. नारायणभाऊ यांनी इंटरमधून शाळेला रामराम ठोकला व त्यांनी बाबांच्या दरबाराचे व्यवस्थापनकार्य हाती घेतले. मनमिळावू व सोज्वळ स्वभावाचे नारायणभाऊ लोकांना बाबांच्या परगावी तारखा देऊ लागले. भक्त लोकांना संतोष होऊ लागला. श्री बाबांचे दर्शन तृषार्त सद्‌भक्ताच्या घराला लागल्यामुळे ते धन्यता मानू लागले. बाबांचा महाराष्ट्रात दौरा सुरू झाला. बाबांनी लाखो भक्तांना दर्शन दिले. नागपूर येथील बाबांचा दर्शनसोहळा, रथातील मिरवणूक अपूर्व होती. चार घोड्यांच्या रथात घोड्यांच्या नृत्यप्रदर्शनासोबत बँडच्या व भजनी मंडळींच्या नादब्रह्मात पुंडलिक नावाचे जयजयकारात हजारो भक्तवृन्दाच्या मेळाव्यात माडीवरून, सज्जावरून रथावर होणाऱ्या पुष्पवृष्टींच्या सोहळयाचे ज्यांनी दर्शन घेतले असेल त्यांच्या डोळयातून श्रीबाबांच्या गौरवाच्या आनंदात आनंदाश्रू टपकले असतील यात नवल नाही.

विदर्भातील राजना, नेरपरसोपंत, नागपूर, बहिरम आदी ठिकाणी बाबांची यात्रा भरू लागली. जेथे बाबा जात तेथे यात्राच भरू लागली. बाबा आपल्या केवळ अस्तित्वाने जनमानसात धर्मभाव जागृत करीत आहेत.

अशा प्रकारे गोरेगावावरून धर्मध्वजा फडकविल्यानंतर १९७२ चैत्रात गुढी-पाडव्याचे सुमुहूर्तावर मूर्तिजापूर येथे राहण्यास आले.

१९५८ मध्ये गोरेगावला काटेपूर्णा नदीचा पूर चढला असताना आईच्या भयविस्मीत चेहऱ्याकडे बघून बाबा म्हणाले होते- "आई आपण मूर्तिजापूरला जाऊ" पुढे या शब्दाची विस्मृती पडली व ४-५ वर्षे निघून गेली. एक दिवस बाबा राधाकिसन महाराजांचे मांडीवर बसून म्हणू लागले, 'गाडगे महाराज काय म्हणत होते बुवा?' राधाकिसन बुवा विचार करू लागले. उत्तर सूचेना. मग बाबा बोलले, मूर्तिजापूरला चला ना बुवा. राधाकिसन बुवांच्या डोक्यात प्रकाश पडला. कारण

गाडगे महाराज खंडूनानाजवळ म्हणाले होते की, तुम्ही माझ्या धर्मशाळेजवळ बाबांना मूर्तिजापूरला घेऊन या, तेच तुम्हाला सोईचे आहे. परंतु खंडूनानांनी गोष्ट मनावर न घेतल्यामुळे राहून गेली होती. या सर्व गोष्टींचे राधाकिसन महाराजांना स्मरण झाल्यानंतर भक्तमंडळी आईला सांगून मूर्तिजापूरला आश्रमासाठी शेत–खरेदी करण्याच्या कामाला लागली. परंतु शेत मिळेना.

बाबा एके दिवशी बोलले, दर्यापूर रोडवरील चांभाराचे शेत आहे. त्याप्रमाणे भक्तमंडळीने चांभाराची भेट घेतली व दर्यापूर रोडवरील शेत १९६४ साली खरेदी केले. त्यानंतर बाबांचे मूर्तिजापूरला स्थलांतर म्हणजे एक स्वप्नच होऊ पहात होते. कारण गावचे लोकांचा या गोष्टीला विरोध होता. चालकांजवळ आश्रम उभारण्यासाठी पैसाही नव्हता. परंतु बाबांनी सूत्र हलविले. भराभर देणग्या जमा झाल्या व कामाला सुरूवात झाली. यात्रेकरूंच्या पाण्याची सोय म्हणून पाण्याची मोठी टाकी बांधली. बाबांचे नागपूचे भक्त श्री. जोशी त्याकरता स्वतः राबले व परिवाराच्या राहण्याची घरे तयार झाल्यानंतर बाबा १९७२ च्या गुढीपाडव्याला मूर्तिजापूर येथे राहण्यास आले.

बाबांचा चैत्रपंचमी रौप्यजयंती महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा झाला. यात्रेकरूंच्या भव्य मेळाव्यात मूर्तिजापूरच्या पुण्यभूमीवर श्री बाबांची लोभस गोजिरी स्वानंद विलासी मूर्ति आपल्या आत्मप्रभेनें पुन्हा तळपू लागली.

☆ ☆ ☆


# श्रीसाईलीला

आक्टोबर१९८०चा अंक बालसाहित्य विशेषांक म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. या अंकात मुला मुलीनी श्रीबाबांविषयीचे लिहीलेले अनेक लेख संग्रहीत करण्यात आले आहेत.

श्रीसाईलीलेच्या साठ वर्षाच्या वाटचालीत असा हा अंक प्रथमच प्रकाशित करीत आहोत.

पृष्ठे ६४ किंमत १ रु.

मुखपृष्ठावर श्रीसाईबाबांचे सुरम्य तिरंगी संग्राह्य चित्र.

# श्रीसाईलीला – साठ वर्षे

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मुखपत्र असलेल्या या मराठी मासिकाला पुढील वर्षी साठ वर्षे लागत आहेत. श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणानंतर अवघ्या दोनच वर्षांनी श्रीसाईलीलेचा जन्म झाला. एवढी दीर्घ वाटचाल केलेले एकही मराठी मासिक महाराष्ट्रात नाही. महाराष्ट्रातून प्रकाशित होणाऱ्या व आध्यात्मिक विषयाला वाहिलेल्या मासिकांच्या मालिकेत श्रीसाईलीलेचा दर्जा सर्वोच्च समजला जातो. भक्तांचे तर आपल्या या लाडक्या मासिकावर नितांत प्रेम आहे. जगभर पसरलेले बाबांचे भक्त हे मासिक मोठ्या आवडीने व बारकाईने वाचतात. कित्येक ठिकाणी तर या मासिकातील अग्रलेखांचे व काही लेख-कवितांचे सामुदायिकरित्या वाचन केले जाते. साईलीलेचा दरमहाचा एक अंक सुमारे १५ वाचकांच्या हाती जातो असा आमचा अंदाज आहे. आज मराठी व इंग्रजी-हिंदी अशा दोन वेगळ्या आवृत्त्या या मासिकाच्या प्रसिद्ध होतात. अनेक भक्तांनी तर या मासिकाचे क्रमवार अंक बांधणी करून व्यवस्थित करून ठेवले आहेत. फावल्या वेळात या मासिकांचे, वाचन त्यांचे चालूच असते.

अशा या साई भक्तांच्या आवडत्या मासिकाला पुढील वर्षी–एप्रिल १९८१ त साठ वर्षे लागत आहेत. साठाव्या वर्षात ते पदार्पण करीत आहे. यानिमित्ताने भक्तांना आपल्या या प्रिय मासिकाच्या संबंधाने आणखीन सुधारणेच्या दृष्टीने जर काही सांगावयाचे किंवा सुचवावयाचे असल्यास त्यांनी अवश्य सुचवावे. त्यांनी आपले निवेदन अगदी थोडक्या शब्दात कागदाच्या एकाच बाजूने सुवाच्य लिहून ते पुढील पत्यावर १ डिसेंबर १९८० पर्यंत पाठवावे. काही पत्रांचा परामर्ष जानेवारी १९८१ चे अंकात प्रसिद्ध केला जाईल. पत्ता-संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४

श्री पुंडलिकबाबांच्या वास्तव्याने उद्धारलेला गाव

# — —० मूर्तिजापूर ०— —

● मूर्तिजापूर खरं म्हणजे विदर्भाच्या अकोला जिल्ह्यातील तालुक्याचे एक नगण्य गाव. रेल्वेचे जंक्शन असल्याने जरा बरेसे रेल्वे स्टेशन सोडले, तर या गावाचा जगाशी काही संबंध असेल असे वाटतही नसे. गावात जाणारा एकमेव रस्ता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला थाटलेली दुकाने, किरकोळ कापडचोपड, किराणा मालाची ! रात्रौ १० नंतर सर्वत्र चिडीचिप ! कुठे गडबड नाही की गोंधळ नाही. त्या मानाने स्टेशनचा परिसर मात्र गजबजलेला, त्यातच जवळच एस. टी. स्टँड आल्याने गजबजाट वाढलेला आहे. त्यामुळे स्टेशनवर उतरून बाहेर पडणाऱ्या पाहुण्याला कोण्या मोठ्या गजबजाट असलेल्या शहरात आल्याचा भास होतो. पण एकदा का मुरारजी चौक सोडला की नेहमीच्या शुकशुकाटाची जाणीव व्हावी. पण याही गावचे भाग्य उजळण्याच्या मार्गावर आहे. श्री पुंडलिक महाराजांच्या सानिध्याचाच हा परिणाम ! त्यांच्या दर्शनाला येणारांची संख्या हळूहळू वाढत आहे. प्रत्येक गाडीवर एक ना दोन तरी अनोळखी चेहेरा उतरतोच अन् 'पुंडलीक नगराला कसं जायचं' म्हणून चौकशी करतो.

स्टेशनच्या बाहेर पडल्यावर बाहेर टांगे, सायकल, रिक्शा उभ्या दिसतील, त्यातील कोणतीही आपणास पुंडलीक नगरला नेऊन सोडील. जाताना महाराजांच्या बाबतच्या कथा सांगेल आणि हाच वाटाड्या त्याला परतीची गाडी सांगितली तर नेमका गाडीच्या वेळी आश्रमात येऊन स्टेशनवर नेऊन सोडेल.

अशा प्रकारे दर्शनार्थींच्या गर्दीने या गावचे भाग्य उजळणार आहे. शहराची भरभराट होणार आहे. मूर्तिजापूरला शिर्डी किंवा शेगावचे रूप येणार आहे हे निश्चित. नाहीतरी नगरसारख्या दुष्काळी जिल्ह्यातील आडवळणी 'शिर्डी' गाव कुणास माहीत होता ? श्री साईबाबांच्या वास्तव्यानेच या गावचे नाव सर्वमुखी झाले ना ! हीच गोष्ट 'शेगाव'ची मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावरील वाफेच्या इंजिनांचे पाणी पिण्याचे स्टेशन म्हणूनच 'शेगाव' माहीत होते. एंजीनच पाणी पिणार म्हणून गाडी बराच वेळ थांबायची येवढेच त्या गावचे महत्त्व होते. बाकी गाडीत चढणा-उतरणारांची गर्दी बाजारच्या दिवशी अन् तीही फक्त पॅसेंजर गाड्यातूनच पहायला मिळायची. अन्यथा मेल अगर एक्सप्रेस गाडी वीस, वीस मिनिटे थांबली तरी कोणी चढायला नको की कोणी उतरायचा नाही. आजमितीस या स्टेशनचे स्वरूप

बदलून गेले आहे. गाडी मग ती कुठलीही असो श्री गजानन महाराजांचे दर्शनार्थी तीतून बहुसंख्येने उतरणार व चढणार हे ठरूनच गेले आहे.

वरील दोन्ही गावांच भाग्य उजळलं ते तेथे राहिलेल्या सत्पुरुषांच्या वास्तव्या-मुळेच. मग हा योगायोग म्हणावा की नियतीची करणी म्हणावी ? ते पूर्वजन्मीचं सुकृतही असू शकेल. जी गोष्ट व्यक्तीच्या बाबतीत तीच नगरीच्या बाबतीत. या भागाचं पूर्वसंचित फळास आले असावे हेच खरं !

' या पार्श्वभूमिवर मूर्तिजापूर तर फारच खुलून दिसतं. विदर्भाची सर्वच भूमि ही पवित्र भूमि मानली जाते. त्रेता युगात प्रभू रामचंद्रांनी अश्वमेध यज्ञ केला होता, तो याच मूर्तिजापूर नजीकच्या सालबर्डीत. तातोबाऋषींचा आश्रम या पुण्यभूमीत होता जानकीपुत्र लवकुश इथेच जन्माला आले याच परिसरात वाढले वाल्मिकी ऋषींनी रामयण रचले तेही याच विदर्भ भूमीत. महाभारतकाळात जाल तर त्याही वेळी या भूमीची महत्ता दिसून येते. पांडवांनी आपला अज्ञातवासाचा काल इथेच कंठला. अश्वत्थामा खरं म्हणजे इथलाच शिशुपालाचा गाव 'पालासपला' इथून जवळच आहे दुर्लभ वनस्पतींचा शोध घेऊन आयुर्वेदावर संशोधन करणारे च्यवन तपस्वी व अश्विनीकुमार याच पवित्र भागात रहात असत.

विदर्भ कन्या रुक्मिणीचे स्वयंवर येथून नजीक अमरावतीस घडले. थोडक्यात मूर्तिजापूरचा साराच परिसर पुण्यभूमि म्हणूनच प्रसिद्ध होता हे खरे !

माणसावर वाईट दिवस यावेत तसेच ते रहात असलेल्या वस्त्यांवर परिसरावर येणार नाहीत असे कसे होईल. काळ हा सगळयांना सारखाच ग्रासणार !

युगायुगात ईश्वरी वास्तव्याने दरवळणाऱ्या ह्या भूमीचा सुगंध मध्यंतरीच्या काळात लोप पावला असावा. सबंध विदर्भभूमि निजामशाहीच्या ताब्यात गेली. श्रीक्षेत्र कारंगा, माहुर, कौंडण्यपूर, वाशीम, देऊळगांवराजा, लोणार, मेहेकर या तीर्थक्षेत्रांची काय अवस्था झाली असावी याची कल्पनाच केलेली बरी ! तसा थोडासा इतिहास मूर्तिजापूरलाही असावा. येथे वैदिक काळात एक किल्ला असावा असे इतिहासात नमूद आहे. त्र्यंबकेश्वर महादेवाचे मंदीर हेही गावच्या पुरातनकालीन वैभवाची साक्ष आहे.

त्या काळात या गावास मात्र निराळ्या नावाने ओळखले जात असावे. कारण शिर्सी, दर्यापूर, मुबारकपूर, मूर्तिजापूर ही नावे निजामी काळातच दिली गेली असावीत. या भागात मूर्तिझाअली नावाचा मोंगलांचा नायक होऊन गेला. त्यानेच

हा उद्योग केला असावा. पौराणिक कालीन किल्ल्यात ह्यानेच अरब सैनिक ठेवले होते, असा दाखला आहे.

सांगायचे तात्पर्य वैभवाचा काळ सरून या भागाला पारतंत्र्याची कळा आली होती. आज पुन्हा श्री पुंडलिक महाराजांच्या वास्तव्याने गावचा चेहरा-मोहरा बदलताना दिसत आहे. 'पुंडलिकनगर' हे नवे नामाभिधान कदाचित् त्याचेच द्योतक असेल.

मूर्तिजापूरचा इतिहास पाहताना आणखीही एक गोष्ट लक्षात येते, ती ही की येथील नगरपालिका इ. स. १९१५ मध्ये अस्तित्वात आली होती. आजमितीस तीही वयाची ६५ वर्षे पूर्ण करीत आहे. या कालखंडात शहरवाढ फारशी न झाल्याने तिला फारसे काही करावे लागले नाही. पण या पुढे तिचा व्याप वाढणार आहे. कार्यक्षेत्र वाढणार आहे. तिच्या गावात पुंडलिका भेटी परब्रह्म येणार आहे. येणाऱ्या त्या परस्थांची देखभाल तिलाच करावी लागणार आहे. पाहुण्यांच्या आदराअतिथ्या-साठी वैदर्भीय मंडळी प्रसिद्धच आहेत ते समीकरण लक्षात ठेवून तिला आपला व्याप, कार्यक्षमता वाढवावी लागणार आहे, याची जाणीव ठेवूनच नगरपालिकेच्या सुविद्य सभासदांनी गाववाढीच्या पुढील योजना आखाव्यात.

## दर्शन द्या

(चाल :– मैं एक नन्हासा बच्चा हूँ)

मोठ्या प्रेमाने, भक्तिभावाने, जन येती
पुंडलिक महाराज त्यांना दर्शन द्या
हो त्यांना दर्शन द्या ॥ धृ० ॥

जीवनाचे हे संकट टाळण्या, संताविण कुणी नाही
देव देवळे प्राथूंनी असती, दिसे न चेतन काही
निसर्ग सगळा विकृत झाला, अशांत सारी जनता।
गरीब गुरुदाचा वाली कुणी ना,
तुच पिता आणि माता ॥ २ ॥

सर्व तुम्हाला कळते काही, जनतेची आकांक्षा
'तुकड्यादास' म्हणे द्या सगळे,
संत मार्गाची दीक्षा ॥ ३ ॥

–राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज

- हे अमूल्य रत्न आहे, याचे जतन कर. हे माझे केवळ स्वरूपच आहे. — श्री मुंगसाजी महाराज, धामणगाव (देव)
- अरे हा देवच आहे. याच्या केवळ दर्शनानेच जीवांचे कल्याण होते. — श्री संत गाडगे बाबा
- हा पुंडलिक मोठाच खेळ खेळय्या आहे हा लीलामय मोठा लीला करणारा आहे रे. — श्री बद्री महाराज, मूर्तिजापूर
- श्री पुंडलिक बाबा हे संतांमधले युवराज आहेत. — श्री संत लहानुजी महाराज, टाकरखेडा
- श्री पुंडलिक महाराज हे अवतारी पुरुष असून माझे आराध्य दैवत आहेत. — श्री संत बिक्तु महाराज, टाकरघाट
- श्री पुंडलिक बाबा हे रामाचे अवतार आहेत. केवळ रामच आहेत. — श्री गुलाबबाबा, काटेल, (कोलद)
- श्री पुंडलिक बाबा ही दर्शनीय मूर्ती आहे. — मारोति बाबा, सालबर्डी
- श्री पुंडलिक बाबांसारख्या संताची सेवा केल्याने मनोरथ पूर्ण होतात. — राष्ट्रसंत तुकड्यादास, मोझरी
- श्री पुंडलिक बाबा माझा आत्मा आहे. — परशुराम बाबा, पिंपळोद
- श्री पुंडलिक बाबांसारख्या संताचे दर्शनाने धन्य झालो. त्यांची स्थिती असाधारण आहे. — श्री. बाळासाहेब भारदे
- श्री पुंडलिक महाराज ही संतश्रेष्ठ साक्षात्कारी विभूती होय. — संत अच्यूत महाराज, कौंडण्यपूर
- देव पहावयाचा असेल तर श्री पुंडलिक बाबांकडे जा. ते साक्षात देवच आहेत. — संत देवमण महाराज, लांघीखेडा
- श्री पुंडलिक बाबा हे साधारण संत नाहीत. जन्मोजन्मीच्या तपश्चर्येने अशी स्थिती प्राप्त होत असते. असे संत अढळपदी असतात व मानवाचे कल्याणासाठी ते स्वइच्छेने मृत्यूलोकात अवतार घेतात त्यांचे कार्य अगम्य व अतर्क्य असते. — संत सितारामदास बाबा
- परमहंस स्थितीत रममाण असलेले श्री पुंडलिक बाबा यांचा अधिकार फार मोठा आहे. — पूज्य नाना महाराज तराणेकर (इंदोर

# पुंडलिकबाबांच्या कृपेची अशी ही पाखरण

## हे अमूल्य रत्न आहे. याचे जतन कर हे माझे स्वरूपच आहे

**— श्री भगवान मुंगसाजी महाराज**

● विदर्भात संतविभूतीमध्ये श्रीमुंगसाजीबाबांचे स्थान आगळे आहे. त्यांचे भेटीस एकदा जागतिक महान् संत अवतार मेहेर बाबा येऊन गेले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांची १९३५ साली सालबर्डी येथे केलेल्या महायज्ञात अग्रपूजा केली होती. राष्ट्रसंतांचे गुरु श्रीअडकोजींनी आपले बंधूच आहेत म्हणून सांगितल्याचे तुकडोजींचे एका पदात आहे. धामणगाव नगरी पंढरपूरासारखी दुमदुमत होती.

खंडूनानांनी पुंडलिकबाबाला १९४५ साली कुटासावरून गोरेगांवी आणले. कुटासा गावी परशराम बाबांची व पुंडलिकाची गावकऱ्यांसमवेत मिरवणूक काढली. होती. मन्या मन्या म्हणून म्हणून या पोराला परशराम बाबा हृदयापाशी घट्ट धरीत होते. लोकही हा पोरगा सामान्य नसून एक अवलिया आहे, असे समजत परंतु वडील खंडूजीना शंका होती. गावात उघडानागडा हा पोरगा फिरत होता. लोक त्याला त्रास देत होते. श्री मुंगसाजींची कीर्ती नानांचे कानावर आली. त्यांनी पुंडलिकास धामणगावी न्यायचे ठरविले. खंडूजी, सौ. मंजुळा, तेरा वर्षाचा पुंडलिक, धाकटा नारायण, लहानगी मुलगी चंद्रकला सर्व १९४६ सालचे कार्तिक मासात धामणगावी आले. सर्वांची संगत सोडून पुंडलीक एकदम श्री भगवान मुंगसाजींचे पलंगावर जावून बसला तेथील लोकांनी सेवकांनी त्याला हात धरून ओढण्याचा प्रयत्न केला. मुंगसाजीबाबा म्हणतात खबरदार तोच या गादीचा खरा मालक आहे. त्याला हटवू नका. लोकांना विस्मय वाटला, व पुंडलीकाकडे ते आदराने व सहानुभूतीने पाहू लागले. खंडूजी हे दुरून पहात होते. त्यांना वाटले आता पुंडलीकास चांगलाच मार बसतो. परंतु त्यांना दुसरेच दृश्य दिसले.

ते पलंगाजवळ गेले व मुंगसाजीबाबांना म्हणतात, 'देवा, या वेड्यास तुमच्याकडे आणले आहे, त्याला नीट शुद्धीवर आणा. मुंगसाजीदेव बोलले, 'खंडोजी खरोखरच तू वेडा आहेस. धनगराला रत्न गवसले काय पारख त्याला' अशी गत तुझी झाली आहे. अरे, तो वेडा नाही, अमूल्य रत्न आहे. याचे जतन कर, हे माझे केवळ स्वरूपच आहे. आजपर्यंत या धामणगावात मी त्यांचीच वाट पाहात होतो. लाखोंच्या गर्दीत मी त्याला न्याहाळीत होतो. आता माझे अवतारकार्य

संपले. श्रीमंत यशवंतराव घाडगे या बडोद्याचे भक्ताकडून श्री. मुंगसाजीबाबांनी पुंडलीकास अभिषेक घातला व नूतन कफनी त्यांचे अंगात घातली व पुंडलीकबाबा की जय असे म्हणाले. त्यानंतर तीनच दिवसांनी मुंगसाजीदेवांनी धामणगाव सोडून मुंबईस प्रयाण केले. त्यांनी मुंबईतच नगीन महाल येथे १९५८ साली देह ठेवला. मुंगसाजी देवांनी पुंडलीकाचा हा केलेला गौरव हजारोंनी पाहिला. नानांची भ्रांती फिरली; त्यांचे अंतःकरण गहीवरून आले. डोळयातून अश्रू वाहू लागले. नंतर काही दिवस श्री पुंडलीकबाबा धामणगावीच राहिले. मुंगसाजीदेव गेल्यामुळे लोक त्यांच्यातच मुंगसाजीचे स्वरूप पाहू लागले.

१९४७ साली पौष महिन्यात श्री पुंडलीक बाबा गोरेगावी आले. गावकऱ्यानी पौष पोर्णिमेस थाटात आगमनसोहळा केला. नंतर १९४८ पासून चैत्र शुद्ध पंचमीची जयंतीयात्रा सुरू झाली.

**—श्री. पंढरीदास महाराज**
मु. पो. लोही, ता. दारव्हा, जि. यवतमाळ

---

# घण घणतो घंटानाद

घण घणतो घंटानाद
भक्तांना घालत साद ! धृ.
वैराग्याची साक्ष राहिली
अक्षय जाग्रत धुनी पेटली
संत निवास प्रसाद ! १
लाविली पणा पुण्याई
नाव दिले द्वारकामाई
प्रसन्नता हा प्रतिसाद ! २
मनुष्य केवळ जात ठरे
अहंभाव ना मुळी उरे
फुलुनी आला प्राजक्त ! ३
गंध कोठला दरवळतो
नाद प्रवाहात हा स्फुरतो
मोक्ष सुखाचा आनंद ! ४

**—श्री. श्रीराम आठवले**, एम. ए. बी. टी.
बलवंत सदन, ३४४ नवी पेठ, पुणे ३०

# संत गाडगेमहाराजांची वाणी खरी ठरली

×—×—○—○—×—×

● श्री गाडगे बाबांनी आमचे गोरेगावी बरेचदा येणे केले. त्यांची एकुलती एक कन्या श्रीमती अलौकाबाई आमचे येथील श्री. फकीरजी सोनोने यांना दिली होती. श्री. अंगदराव सानप नावाचे एक सद्‌गृहस्थ गोरेगावला गोवर्धन उत्सव १९३५ पासून करीत असत. त्या कार्यक्रमासही गाडगे बाबांना बोलावित. १९४८ पासून श्री. पुंडलिक बाबांची जयंती यात्रा सुरू झाली. १९५० चे यात्रा उत्सवास आमचे येथील ग्रामस्थानी व आमचे वडील श्री. खंडूनाना यांनी श्री बाबांची तारीख घेतली. त्या वर्षी गोरेगावला मोठा यात्रा-सोहळा आणि अन्नदानाचा कार्यक्रम पार पाडला. रात्री श्री गाडगे बाबांचा कीर्तन कार्यक्रम झाला. कीर्तन आटोपल्यावर श्री बाबांनी आमचे वडिलास बोलावून म्हटले, 'घरी जाऊन एक भाकर व बेसन घेऊन या!' त्याप्रमाणे आमचे वडील भाकर व बेसन घेऊन त्यांच्याकडे गेले. सोबत अजूनही काही गावकरी मंडळी होती. तेव्हा गाडगे बाबा म्हणतात, 'खंडूजी, तुमच्या पोटी आलेला हा मुलगा हा देवरुपी आहे. तुम्ही ह्या पुंडलिक बाबांना मूर्तिजापूरला ठेवा. मी गोरक्षणमध्ये जागा देतो व काही लोकांकडून मकान-सुद्धा बांधून देतो. ते तुमच्याच स्वाधीन राहील अथवा इतरेत्र मूर्तिजापूर आणावेच लागेल असे मला वाटते.'

आमचे वडिलांनी तेव्हा श्री गाडगे बाबांचे समोर काहीच होकार-नकार दिला नाही. पुढे १९५९ ला काटेपूर्णा नदीला महापूर आला. गावचे सर्व लोक भयभित झाले. बाबांची माता मंजुळा आईने पुंडलिक बाबांना विचारले, 'बाबा! आता आपण कोठे जावे?' तेव्हा बाबा म्हणाले, 'मूर्तिजापूरला जाऊ. बुवा गाडगे बाबा काय सांगत होते ते करा.' नंतर १९६४ ला मूर्तिजापूरजवळ शेत घेण्यात आले आणि १६ मार्च १९७२ वर्षप्रतिपदेला श्री पुंडलिक बाबांचे पुंडलिक नगर मूर्तिजापूर येथे आगमन होऊन वास्तव्य सुरू झाले. खरोखरच संत हे द्रष्टे असतात हे उपरोक्त घटनेवरून वाचकांच्या सहजच लक्षात येईल.

—श्री. नारायण पातोंड

# तुझी तिजोरी उघडून पहा

● मी तेव्हा राजना येथील श्री. ज्ञानदेव भानजी पाटील यांचेकडे दिवाणजी म्हणून होतो. १९४४ साली डी. बी. पाटील फर्ग्युसन कॉलेज, पुणेमधून बी. ए. होऊन गावी आलो. सगळी पाश्चात्य विचारसरणी डोक्यात भरूनच घरी आल्याबरोबर सगळे देव-देवपाठ एका गाठोड्यात बांधून ठेवले. उच्च शिक्षणासाठी लंडनला जायची तयारी होऊ लागलो. परंतु ईश्वरेच्छा निराळीच होती.

आईचे प्रकृतिमुळे त्यांना परदेशी शिकायला जायचा विचार सोडावा लागला. अनिच्छेनेच, परंतु आईकरता म्हणून आईला घेऊन ते श्री मुंगसाजीमहाराज, धामणगाव यांचेकडे गेले व दर्शनाने परिवर्तन घडून गावी आले. जय मुंगसाजी-माऊली हा नामघोष घेऊनच. नंतर श्री मुंगसाजीदेवाचे मुंबईला जाणे त्यांना आणण्याकरता सत्याग्रह वगैरेकरता तनमनधनाने श्री. दादासाहेब राजनेकर झटले, परंतु देवाचे विदर्भात येणे झाले नाही. श्री. दादासाहेब राजनेकर, श्री. काशीनाथ अप्पा बोंद्रे चिखली, श्री. भिकाजी पाटील दानापूरकर, श्री. शिवरामजी काटेकर, श्री. देविसींग सराफ ही मुंगसाजीभक्त मंडळी श्री. पुंडलिकबाबांनाच मुंगसाजी रूप मानू लागले. त्यांना तसा अनुभव व साक्षात्कार होऊ लागला.

१९५८ पासून राजना येथे श्री मुंगसाजी पुण्यतिथी उत्सव सुरू झाला व मुंगसाजीची पालखी घेऊन दादासाहेब व भक्तमंडळी शंकरराव गावंडे, नारायणराव इंगळे, प्रभाकर पाटील व इतर राजनेकर मंडळी पैदल गोरेगाव व धामणगाव परत राजना जाऊ लागले. १२ वर्षे पालखीचा नेम चालला. पुण्यतिथीस राजना येथे श्री पुंडलिकबाबांना आणणे सुरू झाले. मोठा यात्रासोहळा होऊ लागला. १९५९ मधे श्री. दादा जरा आर्थिक अडचणीत आले. पुण्यतिथी उत्सवाची चिंता वाटू लागली. दादा गोरेगावी गेले व श्री बाबांचे समोर बसले असता बाबा म्हणतात, 'तिजोरी उघडून पहा.' तेव्हा राजनेकर म्हणाले, 'बाबा, तिजोरी खाली आहे. एकही रुपया नाही.' 'अरे बाबा, जा तिजोरी उघडून पहा.' श्री देवांची आज्ञा म्हणून दादा गावी आले व बैठकखोलीतील तिजोरी उघडून पाहतात, तर त्यात काहीच नाही. परंतु नंतर त्यांना एक छोटीसी बारीक चिंधी अडकलेली दिसली. ती त्यांनी हाताने जोराने ओढली. तेव्हा तिजोरीचा गुप्त कप्पा बाहेर आला व सोन्याची चिपा व हजाराच्या शंभर नोटा बाहेर पडल्या. त्यांना फारच आश्चर्य व आनंद झाला. २ महिन्यानंतर

त्या नोटांची मुदत संपत होती. त्यांना कागदी मोल आले असते. १ लाखाच्या नोटा व २५ हजाराचे सोने त्यात मिळाले. हे धन वडिलांच्या काकांनी त्यात ठेवले होते, पण कोणासच त्याची माहिती नव्हती. त्या वर्षीचा राजना येथील उत्सव अर्थातच फार मोठ्या प्रमाणात साजरा झाला. चांदूर येथील महादेव मंदिरापासून राजन्यापर्यंत ५ मैल २१ बैलांच्या जोड्या लाऊन श्री बाबांची थाटाने मिरवणूक काढण्यात आली. २ खंडीचा पुरणाचा अन्नदानाचा सोहळा झाला. १९७७ ला दादासाहेब यांना हृदय-विकाराचा झटका आला. त्यांना आपला अंतकाळ दिसू लागला. योगायोगाने श्री बाबा नागपूरवरून मूर्तीजापूरला जात असताना राजना येथे आले व आपल्या आवडत्या भक्तांची शेवटची दर्शनाची इच्छा तृप्त केली.

श्री बाबा निघून गेल्यावर लवकरच दादांनी देह सोडला.

काटेपूर्णा नदीत त्यांचे अस्थींचे विसर्जन त्यांचे चिरंजीव श्री. विवेक ज्ञानदेवराव पाटील यांनी केले.

— श्री. उत्तमराव रंगोले
( स्वातंत्र्यसैनिक ) चांदूर रेल्वे, जि. अमरावती.

---

# हे साई

देई सुस्वर साई रंगण्या भजनी ।
आळवीन मी तुजभावे मनी ॥

नको मज काही लौकिक व्यवहार ।
होईन तल्लीन गाता भजनी ॥

मनी चिंतोनिया पूजीन अंतरी ।
स्वानंदे होईन समाधानी ॥

होवो तुझे ज्ञान अंतर बाह्य ।
स्थिर होवो रुप सुलोचनी ॥

—कु. सुलोचना गुरु गोदावरी,
साकुरी

## श्री मारोति महाराज (सालबर्डीवाले)

## व श्री. परमहंस पुंडलिकबाबा

● माझे संपूर्ण घरातील लोक संतोपासक आहेत. लहान बंधू बाळकृष्ण कड्डू त्यांच्या पत्नी सौ. शोभा कड्डू व माझी पत्नी आम्हा सर्वांवर श्रीबाबांची अनंत कृपा आहे. आमचे सर्व जीवन त्यांनीच घडविले. श्री पुंडलिकांचे आशीर्वादाच्या गोष्टी जेवढ्या लिहू तेवढ्या थोड्याच वाटतात. आमचे घराण्याशी संबंध असलेले श्री मारोती महाराज (सालबर्डी) हे विदर्भात प्रसिद्ध संत म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे जवळ-जवळ ९० ते ९५ वर्षांचे वय असावे. त्यांची व त्यांचे भक्त गणांची वर्षातून एकदा आमचेकडे फेरी असायची. एकदा ते आमच्याकडे असताना १९७४ चे कार्तिक महिन्यात लभाण तांडा शुक्रवारी नागपूर येथे भव्य संतमेळाव्याचे आयोजन केले होते तिथे आला.

त्यात परमहंस श्री पुंडलिक बाबांना आणले होते. तेथून नंतर आमचे घरी श्री बाबांना आणण्यात आले. लहान बंधूकडे श्री बाबा पलंगावर झोपले असताना श्री मारोती महाराज त्यांचे जवळ गेले व त्यांचे दोन्ही पाय हाताने धरून स्वतःचे डोक्यास घासले व आमच्याकडील बायांना म्हणतात, पोरीहो, पुंडलिक बाबांची एखादी जुनी कफनी घरी ठेवत जा. ती फार मोठी गोष्ट आहे. लक्षात ठेवा. श्री मारोती महाराजांनी देह ठेवायचे आधी मला श्री पुंडलिक बाबांकडे न्या असे म्हटल्या वरून मी व त्यांचे काही भक्त त्यांना झोळी करून मूर्तिजापूरास नेले तेव्हा श्री पुंडलिक देवाचे दर्शन घेऊन आम्ही परतलो. १५ दिवसांनी मारोती महाराजांनी वैकुंठगमन झाले. सालबर्डी या तिर्थस्थानी भाविकांसाठी भव्य धर्मशाळा व सदावर्त इत्यादी सोयी श्री मारोती महाराजांनी करून ठेवल्या. एवढी मोठी महान संत मूर्ति श्री पुंडलिकचरणी लीन झालेली आम्ही पाहिली व आम्हास आमच्या भाग्याचा हेवा वाटतो. कारण परमहंसाचे आमचे घरी नेहमी आगमन होते. १९६३ साली स्थापन झालेल्या श्री पुंडलिक महाराज भक्तजन मंडळ, नागपूर या ट्रस्टचा मी प्रथम अध्यक्ष होतो.

— श्री. रामकृष्ण नारायण कड्डू, नागपूर

## चिंधे महाराजांचे संकट हरण

● श्री गाडगे बाबांच्या अनुयायांमध्ये श्री चिंधे महाराजांचे स्थान फार मोठे आहे. त्यांना एकदा त्यांचे यवतमाळ येथील मठात सर्पदंश झाला. भक्तानी त्यांना झोपडीत नेले. त्यांची शुद्ध हरपली. एवढ्यात एक कफनी घातलेली बालमूर्ति झोपडीत आली. त्यांनी श्री चिंधे महाराजांवर पाण्याचा शिडकावा केला व म्हणाले, यांना उद्या गोरेगावला न्या व बालमूर्ति निघून गेली. दुसरे दिवशी श्री चिंधे महाराज व काही भक्तमंडळी गोरेगावास आली. तेव्हा श्री पुंडलिक बाबा चिंधे महाराजांना म्हणाले, 'सापाच्या तडाख्यातून वाचलो हो' श्री चिंधे महाराजांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. ते श्री बाबांचे चरण पकडतात व सद्‌गद होतात.

— एक चिंधेभक्त

## मन पाखरू

जाय जाय पाखरू
उडी तू शिरडीले
नको माले इसरू
सांग जो साईंवाले ॥

जाय जाय पाखरू
जाय तू शिरडीले
तुम्ह नाम समरु
सांग निरोप बाबाले ॥

जाय जाय पाखरू
घरदार मी सवारु
आंतर पडे भेटाले ॥

जाय जाय पाखरू
जाय साईबाबाकडे
लीला म्हणे काय करू
सौसार नई आवडे

—लीला मराठे
साक्री रोड, धुळे,

# विदेही सती अनसूया मातेवर

## श्री पुंडलिक बाबांची कृपा

● सन १९६६ चे मे महिन्यात माझे वडील श्री यादवरावजी चोपडे यांनी गोरेगावचे महान संत परमहंस श्री पुंडलिक बाबांची पारडसिंगा, ता. काटोल, जि. नागपूर येथे तारीख घेतली. आमचे गावी श्री पुंडलिक बाबा येणार म्हणून संपूर्ण काटोल तहसीलीतील हजारो भक्त लोक गोळा झाले. सायंकाचे ५ वाजता नागपूरवरून श्रीबाबांची गाडी आली. गाडीतून श्रींना आमचे गावकरी भक्तमंडळींनी सजविलेल्या रथात बसविले. स्वयंस्फूर्तीने भक्तमंडळी रथामागे व पुढे श्रींचा जय-जयकार करीत वाटेने जात होते. गावात ठिकठिकाणी स्वागतद्वारे सजली होती. दुकानदारांनी आपले दुकानासमोर विद्युत रोषणाई केली होती. कुणी कापडाची, कुणी नारळाची तोरणे उभारली होती. मिरवणूक मंडपस्थानाकडे जात असताना एकाएकी रथ थांबविला. आमच्या गावात वेड्यात गणना असलेली अनसूया एका पडवीत बसली होती. ती जोराने ओरडून 'श्री पुंडलिकबाबा की जय' असे तिनदा म्हणाली, तेव्हा श्री बाबांनी वरून एक नारळ जोराने फेकून मारला तेव्हा ती जोरजोराने हसून स्तब्ध झाली व पडून राहिली. दुसरे दिवशी श्री बाबांना त्यांचे नागपूरकर भक्तांनी जबरदस्तीने मोटारीत बसवून घेऊन गेले. काल्याचा कार्यक्रम राहून गेला. कार्यकर्ते भक्तमंडळी नाराज झाली. तेवढ्यात या अनसूया माता तेथे आल्या व म्हणाल्या, श्रीबाबांनी मला काला करण्याचा आदेश दिला आहे. तेव्हा तिचे हातून काल्याचा प्रसंग पार पडला. परंतु तेव्हापासून येथील ही बाई सती अनसूया माता म्हणून प्रसिद्धीस आली व आमचे पारडसिंगा गाव श्रींचे पाय लागल्यापासून तीर्थ-क्षेत्र झाले. मी स्वतः फारसा बुद्धी नसलेला मुलगा म्हणून गावात प्रसिद्ध होतो. मॅट्रीकला दोनदा नापास झालो, परंतु एकदा बाबा मला म्हणाले, या डॉक्टर, आणि बरोबर मी बी. ए. एम. एस. वैद्यकीय परिक्षेत १९७७ साली नागपूर विद्यापीठातून दुसऱ्या गुणवत्ता क्रमांकाने उत्तीर्ण झालो.

धन्य आहेत माझे बाबा !

—डॉ. प्रकाश यादवराव चोपडे.
पारडसिंगाजी, नागपूर,

## श्री विक्तुबाबा श्री पुंडलिकबाबांना गुरुस्थानी मानतात

● १५ एप्रिल १९१८ साली टाकळघाट जि. नागपूर येथे जन्म झालेले व हाता-पायात बेड्या घालून तपश्चर्या करीत असलेले विक्तुबाबा यांना १९५९ साली साक्षात्कार झाला व सागरांच्या लाटावर आरुढ झालेले श्री पुंडलिकबाबा म्हणाले, तू माझेकडे ये. त्याप्रमाणे मी व काही भक्तमंडळीसह विक्तुबाबांना घेऊन गोरेगाव जि. अकोला येथे गेलो तेथे तिन दिवस राहिल्यावर श्री पुंडलिक देव बोलले, 'सोळा आणे होण्यास वेळ आहे.' त्यांचे हे शब्द पुढे सोळा महिन्यांनी खरे झाले. १९६० चे कार्तिक पौर्णिमेस श्री विक्तुबाबांचे हातापायातील बेड्या आपोआप गळल्या. तेव्हा भगवान श्री पुंडलिकबाबांचा जयघोष करण्यात आला व कार्तिक पौर्णिमेला टाकळघाट येथे मोठा मेळा भरू लागला. आज हजारो लोक विक्तुबाबांचे दर्शनास येतात. त्यांनी हातापायात पुन्हा बेड्या ठोकून घेतल्या. आमचे येथील प्रार्थना प्रथमप्रथम श्री पुंडलिकबाबांचे जयजयकाराने सुरू होते.

—श्री. बापूरावजी डांगरे,
( विक्तुबाबांचे भाऊ )
मु. पो. टाकळघाट,
जि. नागपूर.

☆ ☆ ☆

## श्री परमहंस पुंडलिक बाबांची आरती

जय जय सद्‌गुरु पुंडलिका । देई तव प्रेम प्रभो ।
गोरेगावी देहि विदेही । ध्यानी मनी भगवान
मुंगसाजी सद्‌गुरु कृपेने । ब्रह्म स्वरूपी रममाण । १ ।

धन्य खंडूजी धन्य मंजुळा । संसारी गुणगान
कुशी तयांच्या अवतरलासी । सगुणरुप तव ध्यान । २ ।

भक्त जना आधार तुझाची । कनवाळू गुरुराज
नाम तुझे मंगलमय गाता । रक्षण करशी लाज । ३ ।

थोर तुझा महिमा गुरुराया । सर्व सुखाचे धाम
अंत न लागे सामर्थ्याचा । व्यापक आत्माराम । ४ ।

तोडूनिया भव बंधन देई । तव चरणाची आस
ओवाळीतो आरती दयाळा । शरणांगत प्रभूदास

# श्रीगुरुचरित्रातील मंदमती ब्राम्हणपुत्र

—प्रा. श्री. र. श्री. पुजारी
रमा–निवास, ९१२ सदाशिव पेठ,
पुणे–३०.

● सरस्वति गंगाधर रचित 'श्रीगुरुचरित्र' ग्रंथात मंदमती ब्राह्मणपुत्रांच्या दोन कथा आहेत. त्या दोघांपैकी एक कुखपूरचा आहे; दुसरा करवीरक्षेत्रीचा आहे. अनाथपण, विद्याहीनता, जननिंदा यामुळे जीव नकोसा झालेले हे दोघे तरुण आहेत. ब्राम्हण कुळात जन्म; वेदशास्त्रसंपन्न पिता; मौजीबंधापर्यंतचे सर्व शुभ संस्कार; थोडक्यात म्हणजे अध्ययन–अध्यापन या विहित कर्मास अत्यंत अनुकूल अशी शुचितेची उत्तम पार्श्वभूमी; ती लाभूनही न लाभलेल्या मुख्य त्या एका गोष्टीमुळे त्यांचे जीवन उदास झाले आहे. ती गोष्ट म्हणजे मती! बुद्धी! जणू कोण्या पूर्व पापाबद्दल या जन्मी त्याना मिळालेला हा शाप आहे!

श्रीगुरुचरित्राच्या आठव्या अध्यायातील कुखपूरच्या त्या दुर्दैवी तरुण मुलाबद्दल चरित्रकारानी काय लिहून ठेवले आहे पहा—

" गावातील लोकांनी त्याची हुर्योच करावी. म्हणावे; असा कसा रे तू जन्मास आलास! तुला डोके नाही की काडीची अक्कल नाही! अरे मूर्खा! तुला डोके नाही की काडीची अक्कल नाही! अरे मूर्खा! कसा तुझा बाप आणि कसा तू! चारी राष्ट्रात वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हण म्हणून त्याची ख्याती! कीर्ती! त्याच्या पोटी तू अक्षर शत्रू जन्मास आलास!... धन्य! धन्य केलेस बरे आपल्या कुळास! अरे, साधी पोट भरण्याची अक्कलसुद्धा तुला असू नये! दारोदारी भीक मागतोस आणि पोट भरतोस! लाज नाही वाटत तुला असल्या जिण्याची! जा, पोटाला धोंडा बांध आणि गंगेत जीव दे! तुझ्यासारखा पशू जगला काय आणि मेला काय सारखाच!

" लोकांचे हे निष्ठुर बोलणे ऐकून त्या मुलाला फार दुःख होई. नाना तऱ्हानी तो स्वतःस बोल लावी. दुःखाचा कढ अनावर झाला की आपल्या विधवा आईकडे येई. रडत बसे. म्हणे : आई! जगून माझा काय उपयोग! तुला व्यर्थ शिणविले. वयाने नुसता वाढलो. तुझ्या पोटाला घालण्याची ताकद माझ्या अंगी नाही. मला

माझी लाज वाटते. जगाला हे तोंड दाखविण्यापेक्षा मी रानावनात कोठे तरी निघून जातो."

एकुलत्या एक मुलाचे दुःखाचे हे उद्गार ऐकून त्या माउलीला फार वाईट वाटे. ती रडू लागे. जननिंदेमुळे तिलाही जीव नकोसा होई. असे जगण्यापेक्षा जीव गंगार्पण करणे बरे असे तिला वाटे.

एक दिवस ही मायलेकरे खरोखरच गंगाप्रवाहात उतरली. गंगामाईने पोटात घेतले की सुटलो, या विचाराने खोल खोल पाण्यात शिरू लागली. तोच यतिवर्य श्रीपाद श्रीवल्लभ तेथे स्नान करताना त्याना दिसले. श्रीदत्तप्रभूंचे हे दुसरे अवतार.

"करुणावत्सल श्रीपादांनी त्या स्त्रीची करुण कहाणी ऐकून घेतली. पुढील जन्मी श्रीपादांसारखा पुत्र पोटी येण्यासाठी प्रदोषपूजेचे व्रत तिला सांगितले. अनन्य भावाने शरणागत झालेल्या त्या मंदमती पुत्राच्या मस्तकी आपला कृपाहस्त ठेवला, आणि त्याच क्षणी सर्व शास्त्रे, विद्या त्याला अवगत झाल्यामुळे कुरवपूर येथील एक विद्वान, वेदशास्त्रपारंगत ब्राह्मण म्हणून तो प्रतिष्ठा पावला."

एवढी हकिकत सांगून, ती ब्राह्मण स्त्री प्रदोषव्रतामुळे पुढील जन्मी वऱ्हाड प्रांतात कारंजा येथे एका शिवभक्त ब्राह्मण कुळात कशी जन्मली; तेथीलच माधव नावाच्या एका शिवव्रती तरुणाशी तिचा विवाह होऊन पुढे तिला महान तेजस्वी पुत्र कसा झाला; संन्यास घेऊन, तीर्थाटने करीत श्रीपादांप्रमाणेच जगदोद्धाराचे कार्य तो पुत्र कसे करू लागला हे सांगितल्यानंतर सतराव्या अध्यायात करवीरक्षेत्रीच्या त्या मंदमती ब्राह्मणपुत्राची हकिगत सांगताना चरित्रकार सरस्वतिगंगाधर सांगतात–

मातापिता निवर्तल्यामुळे तो ब्राह्मणपुत्र करवीरक्षेत्री आपल्या आजोळी येऊन पडला. मंदमती असलेल्या त्या ब्राह्मणपुत्राची निर्भर्त्सना खुद्द ब्राह्मणमंडळीकडूनच होऊ लागली. ती ऐकून, दुःखी होऊन तो मुलगा स्वतःलाच बोल लावी. म्हणेः मागील जन्मी विद्या जवळ असताना मी ती कोणालाही दिली नसेल. विद्यादान हातून घडले नसेल. म्हणून या जन्मी मला विद्या मिळाली नाही. आता रडून काय उपयोग ?

विद्यावंतांकडे जाऊन, काकुळती येऊन तो मुलगा म्हणेः महाजनहो ! माझ्यावर एवढी दया करा. भीक घाला. विद्या मला येईल असा काही उपाय असल्यास तो मला कृपा करून सांगा.

त्याची ही तळमळ ऐकूनही थट्टेखोर ब्राह्मणमंडळी त्याची कुचेष्टाच करीत. मर्मभेदी शब्दांनी त्याला पुनः पुन्हा घायाळ करीत. यामुळे वैतागाने तो मुलगा स्वतःशी म्हणू लागला: देवा! मी जगलो तरी कशासाठी? जन्मतःच मेलो का नाही?

एक दिवस तो मुलगा घरातून निघून गेला. दिवसभर अन्नपाण्याविना काट्या-कुट्यातून चालत कृष्णाकाठी भिल्लवडी या गावी आला. तेथील निर्जन रानातील भुवनेश्वरी देवीच्या दारी तीन दिवस अन्नपाण्यावाचून विद्यालाभासाठी धरणे धरून बसला. तरीही देवीचा कौल होईना. तेव्हा निराशेने त्याने स्वतःची जीभ कापून देवीस अर्पण केली. आता शिर कापून ते देवीस अर्पण करणार, तोच देवीचे शब्द स्पष्टपणे त्याच्या कानी आले: लेकरा! असा दुःखी होऊ नको. ऊठ. या कृष्णेच्या तीरावर एक घनदाट औदुंबरवृक्ष आहे. त्याच्या तळवटी एक अवतारी पुरुष राहातात. साक्षात् श्रीशंकरच असे ते एक तपोनिधी आहेत. त्यांच्याकडे तू जा. तुझी इच्छा ते पुरी करतील.

पोहून, कृष्णानदी पार करून तो तरुण पश्चिम तटावर आला. तेथे औदुंबर-वृक्षाखाली श्रीस्वामीनृसिंह सरस्वती त्याच्या दृष्टीस पडले. श्रीदत्तप्रभूंचे हे तिसरे अवतार. त्यांच्या चरणी त्याने मस्तक ठेवले. त्यांच्या पायाशी बसून हात जोडून, श्रीगुरूंचे स्तवन तो परोपरीने करू लागला.

"हा त्याचा भोळा भाव पाहून श्रीगुरू संतुष्ट झाले. त्यांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. आणि काय आश्चर्य, त्याच क्षणी त्याला जिव्हा आली. वेद–शास्त्र–पुराणे, तर्क-भाषा-व्याकरण यांचे ज्ञान एका क्षणात झाले."

या दोन्ही कथातील तरुणांची व्यथा एकच आहे. श्रीगुरूंची भेट ज्या नदीतिरी झाली, ती नदी कृष्णा आहे. फार काय, त्या त्या अवतारातील नावे भिन्न असूनही कृपासागर सद्गुरू एकच आहेत.

भक्त कसा असावा याचा आदर्श म्हणजे हे दोन तरुण. वडीलधाऱ्यांनी केलेली कुचेष्टा सहन करूनही विद्येसाठी ते त्यांच्या चरणांचे दास होऊ इच्छितात. अंतर्मुख होऊन आपल्या दुर्भाग्याचे खापर स्वतःच्याच माथी घेतात. आपले छळवादी प्रारब्ध सुधारण्यासाठी सद्गुरूंना अनन्यभावे शरण जातात.

मनाचा हा सरळपणा, स्वदोष जाणण्याची अंतर्मुख वृत्ती, सेवाभाव, ईश्वरनिष्ठा या गुणांमुळेच त्यांच्यावर कृपा झाली.

अनाथांचे नाथ "श्रीपाद श्रीवल्लभ–श्रीनृसिंहसरस्वती" दत्तप्रभू दुःखार्तांना विद्या-धन-प्रतिष्ठा केवळ इच्छामात्रेकरून एका क्षणार्धातूही कसे प्रदान करू शकतात याच्या या दोन सत्यकथा होत.

❖ ❖ ❖

## इंडियाचा साधू म्हणूनी । तूच बोलिला तुकडोजी लागुनी

● १६ नोव्हेंबर १९६७ ची कार्तिक पौर्णिमा, संतांचे मुकूटपणी राष्ट्रसंतांचे सद्गुरु अडकोजी बाबांचा यात्रा सोहळा. राष्ट्रसंतांनी या वेळेस संत मेळावाच ठेवला होता. योगीराज लहानुजीबाबा आले. सालबर्डीचे मारोती महाराज, बालयोगी अनंतमहाराज, सत्यदेव बाबा, परमहंस श्री पुंडलिक बाबांनाही मोटार पाठवून बोलविले. एक लाखाचा जनसमुदाय या वेळेस वरखेड ग्रामी जमला होता. काल्याचे कार्यक्रमाचे आधी विद्वानांची भाषणे चालली होती. तेवढ्यात श्री पुंडलिक बाबा उठून वर व्यासपीठावर चढायला लागले. मी त्यांना ओढून वर जावू देत नव्हतो तेव्हा मला एक झटका मारून श्री पुंडलिक बाबा व्यासपीठावर गेले व एकदम राष्ट्रसंतांचे मांडीवर जावून बसले. मी जरा अस्वस्थ झालो तेव्हा वंदनीय महाराज मला म्हणाले, ' बसू दे ' व छायाचित्रकाराना खूण करून परस्पर फोटो घ्यावयास लावले. मी तर एका निराळ्याच भावविश्वात तल्लीन झालो. श्री बाबांचा व राष्ट्रसंताचा हळूहळू निरागस संवाद चालला होता. एक लाखाचा विराट जनमुदाय या दोन संतांचे मीलन पाहून आनंदाने जयघोष करीत होता. त्यांच्या आनंदाला सीमा नव्हती. तेव्हा पुंडलिक बाबा राष्ट्रसंताना उद्देशून एक वाक्य मोठ्याने बोलून म्हणतात, ' आपण तर इंडियाचे साधू आहात.'

व्यासपीठावर विद्वान मंडळींनी हे वाक्य ऐकले तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटले. 'थोर संताचे तोंडून निघालेले ते वाक्य महावाक्य होते. वीस मिनिटे श्री बाबा वंदनीय महाराजांचे मांडीवर बसून होते. नंतर उठून बाजुला लोडाला टेकून बसले. नंतर राष्ट्रसंत बोलावयास उभे राहिले.

● विदेही संताची अवस्था व कृपादृष्टी हाच त्यांचे बोलण्याचा विषय होता. राष्ट्रसंत म्हणाले, श्री पुंडलिक बाबांची स्थिती ही माझे सद्गुरु अडकोजींचेसारखी आहे. काहीच फरक नाही. अशांचे कृपेनेच हा विश्वगाडा चालला आहे.

नंतर १९६८ ला राष्ट्रसंतांचा गोरेगावला यात्रेप्रसंगी भजनाचा कार्यक्रम झाला. त्यांचे जीवनातील सर्वात शेवटचा असा मोठा हाच कार्यक्रम होय. नंतर चार महिन्यांनीच ते ब्रह्मत्वात लीन झाले. यात्रेत राष्ट्रसंतानी श्री बाबांवर एक पद रचले आहे, ते या अंकात अन्यत्र दिले आहे.

—श्री. नारायण पातोंड

एक संग्राह्य लेख—

# श्रीसाईबाबा अष्टोत्तरशतनामावलिः।

[ मराठी तर्जुमा सहित ]

ले. कर्नल **मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
१/१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस
बंड गार्डन रोड, पुणे – ४११००१.

● एकदा शिरडीत द्वारकामाईत मी दर्शनाला गेलो असताना एका भक्ताला श्रीबाबांच्या तसबिरीकडे पाहून श्रीबाबांची १०८ नावे तोंडपाठ म्हणताना ऐकले व मलाहि आपण तसे करण्याची स्फूर्ति झाली. हळूहळू सर्व नावे पाठ केली व आता ती रोज पूजेचे वेळी श्रीबाबांच्या फोटोकडे पहात किंवा श्रीबाबांच्या मूर्तीला अभिषेक करतेवेळी म्हणण्यात अत्यंत आनंद होत असतो. आश्चर्य म्हणजे सर्व नावे म्हणायला ४ ते ५ च मिनिटे लागतात.

ईश्वराच्या नामस्मरणाचा महिमा तर सर्वच संतांनी गाईला आहे व पुराणातही सांगितला आहे. श्री साईसच्चरितातच पहा ना!

नामापरीस सोपें आन। अंतःशुद्धीस नाहीं साधन।
नाम जिव्हेचें भूषण। नाम पोषण परमार्था॥ अ० २७ ओ० ८८॥

नाम घ्यावया नलगे स्नान। नामासि नाहीं विधीविधान।
नामें सकळ पाप निर्दळण। नाम पावन सर्वदा॥ ८९॥

अखंड माझेंही नाम घेतां। बेडा पार होईल तत्वता।
नलगे कांहीं इतर साधनता। मोक्ष हाता चढेल॥९०॥

जया माझे नामाची घोकणी। झालीच तयाचे पापाची धुणी।
तो मज गुणियाहूनि गुणी। जया गुणगुणी मन्नामी॥९१॥

ईश्वराचे अखंड नामस्मरण करता आले तर उत्तमच. परंतु ते सर्वांनाच साधत नाही व त्या स्थितीस पोहोचायला बराच अवधि लागतो. सुरवातीला तेच तेच नाव एकाच प्रकारे घ्यायला कंटाळाही येणे शक्य असते व जर एका जपमाळेची

१०८ नावे वेगवेगळया तऱ्हेने म्हणता आली तर नवीन भक्ताना ते आवडेल. या उद्देशानेच कदाचित् आपल्या पुराणातून "श्री विष्णुसहस्रनाम" सारख्या निरनिराळ्या देवांच्या नामावल्या आढळतात. त्यांची आणखी एक उपयुक्तता म्हणजे प्रत्येक नावाना इष्टदेवतेचे वेगवेगळया रूपांचे व गुणांचे वर्णन असल्याने त्यांचा विचार मनात येऊन त्या देवतेची मूर्तिमंत प्रतिमा डोळयासमोर उभी राहते व त्या देवते-विषयीची भक्ति द्विगुणित होण्यास मदत होते. परंतु त्यासाठी मूळ संस्कृत नावात चूका नसल्या पाहिजेत तसेच त्यांचा अर्थही नीट कळला पाहिजे.

म्हणून तशी शुद्ध नावे व त्यांचा अर्थ श्रीसाईलीलेच्या वाचकांसाठी येथे देण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी स्वतः संस्कृत पंडित नाही. शाळाकॉलेजातून संस्कृत शिकलो ते व नंतर रामायण, महाभारत, गीता व उपनिषदे यांच्या अभ्यासाने वाढलेले त्या भाषेचे ज्ञान हींच माझी पुंजी. तरी सुज्ञ तज्ञानी काही चूका आढळल्यास मला क्षमा करावी व त्या कृपाकरून मला कळवाव्यात ही विनंति. त्यांचा सर्वानाच उपयोग होईल.

# । श्रीसाईबाबा–अष्टोत्तरशत नामावलिः ।

१ ॐ श्रीसाईनाथाय नमः ।
,, श्रीसाईनाथानां नमस्कार असो.

२ ,, लक्ष्मीनारायणाय नमः ।
,, लक्ष्मीनारायणरूपी साईनाथानां नमस्कार असो.

३ ,, कृष्णरामशिवमारुत्यादिरूपाय नमः ।
,, कृष्ण, राम, शिव, मारुति इत्यादिरूपी साईनाथानां नमस्कार असो.

४ ,, शेषशायिने नमः ।
,, शेषनागावर झोपलेल्या विष्णुरूपी साईनाथानां नमस्कार असो.

५ ,, गोदावरीतटशीलधीवासिने नमः ।
,, गोदावरीच्या कांठी शिरडी येथे राहणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

६ ,, भक्तहृदालयाय नमः । (हृदय + आलय)
,, भक्तांच्या हृदयात राहणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

७ ,, सर्वहृन्निलयाय नमः । (हृद् + निलय)
,, सर्वांच्या हृदयात राहणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

८ ॐ भूतावासाय नमः ।
,, सर्व प्राणी ज्याचे घर आहे अशा साईनाथानां नमस्कार असो.

९ ,, भूतभविष्यद्भाव वर्जिताय नमः ।
,, होऊन गेलेल्या व होणाऱ्या विषयी मोह सोडलेल्या साईनाथानां नमस्कार असो

१० ,, कालातीताय नमः । (काळ + अतीताय)
,, काळाच्या पलिकडे असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

११ ,, कालाय नमः ।
,, काळरुपी (मृत्युरुपी) साईनाथानां नमस्कार असो.

१२ ,, कालकालाय नमः ।
,, काळाचाही काळ असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

१३ ,, कालदर्पदमनाय नमः । (काल+दर्प+दमनाय)
,, काळाचा गर्व जिरविणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१४ ,, मृत्युञ्जयाय नमः ।
,, मृत्युवर विजय मिळविणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१५ ,, अमर्त्याय नमः ।
,, अमर अशा साईनाथानां नमस्कार असो.

१६ ,, मर्त्याभयप्रदाय नमः । (मर्त्य+अभय+प्रदाय)
,, मृत्युला वश असणाऱ्या आम्हा जीवाना अभय देणाऱ्या साईनाथानां
,, नमस्कार असो.

१७ ,, जीवाधाराय नमः (जीव+आधाराय)
,, जीवांना आधार असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

१८ ,, सर्वाधाराय नमः । (सर्व+आधाराय)
,, सर्वाना आधार असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

१९ ,, भक्तावनसमर्थाय नमः । (भक्त+अवन)
,, भक्तांचे संरक्षण करण्यास समर्थ असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

२० ,, भक्तावनप्रतिज्ञाय नमः ।
,, भक्तांचे संरक्षण करण्याची शपथ घेतलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

२१ ॐअन्नवस्त्रदाय नमः ।
,, अन्न व वस्त्र पुरविणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२२ ,, आरोग्यक्षेमदाय नमः ।
,, आरोग्य व कुशल देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२३ ,, धनमाङ्गल्यप्रदाय नमः ।
,, धन व सौभाग्य देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२४ ,, ऋद्धिसिद्धिदाय नमः ।
,, सर्व प्रकारची संपन्नता व सर्व कार्यात यश देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२५ ,, पुत्रमित्रकलत्रबन्धुदाय नमः ।
,, पुत्र, मित्र, पत्नी व नातलग प्राप्त करून देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो'

२६ ,, योगक्षेमवहाय नमः ।
,, सर्व वांछीत वस्तू प्राप्त करून देण्याची व त्यांचा संभाळही करण्याची जबाब-
,, दारी वाहणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२७ ,, आपद्बान्धवाय नमः । ( आपद् + बान्धवाय )
,, संकटात नातलगांसारखा कामास येणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२८ ,, मार्गबन्धवे नमः ।
,, प्रवासात नातलगांसारखा कामास येणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

२९ ,, भुक्तिमुक्तिस्वर्गापवर्गदाय नमः । ( स्वर्ग + अपवर्ग )
,, भोग, मोक्ष, स्वर्ग आणि दुःखाची अत्यंत निवृत्ति अर्थात् ब्रह्मप्राप्ति देणाऱ्या
,, साईनाथानां नमस्कार असो.

३० ,, प्रियाय नमः ।
,, प्रिय अशा साईनाथानां नमस्कार असो.

३१ ,, प्रीतिवर्धनाय नमः ।
,, प्रीति वाढविणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

३२ ,, अन्तर्यामिणे नमः ।
,, ( सर्वांच्या ) हृदयात राहून अधिकार चालविणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

३३ ,, सच्चिदात्मने नमः । ( सत्+चित्+आत्मने )
,, सत्य व शुद्ध चेतन युक्त आत्मा असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

३४ ॐ नित्यानंदाय नमः ।

,, नित्य आनंदरूप असणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

३५ ,, परमसुखदाय नमः ।

,, अत्यंत श्रेष्ठ सुख देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

३६ ,, परमेश्वराय नमः ।

,, परमेश्वररूपी साईनाथानां नमस्कार असो.

३७ ,, परब्रह्मणे नमः ।

,, परब्रह्मरूपी साईनाथानां नमस्कार असो.

३८ ,, परमात्मने नमः ।

,, परमात्मारूपी साईनाथानां नमस्कार असो.

३९ ,, ज्ञानस्वरूपिणे नमः ।

,, ज्ञानस्वरूप साईनाथानां नमस्कार असो.

४० ,, जगतः पित्रे नमः ।

,, जगाचे पिता साईनाथ यांना नमस्कार असो.

४१ ,, भक्तानां मातृधातृपितामहाय नमः ।

,, भक्तांची माता, पालनकर्ता व आजोबा असलेल्या साईनाथानां नमस्कार

,, असो.

४२ ,, भक्ताभयप्रदाय नमः । ( भक्त + अभय )

,, भक्तानां अभय देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४३ ,, भक्तपराधीनाय नमः ।

,, भक्तांच्या आधीन झालेल्या साईनाथानां नमस्कार असो.

४४ ,, भक्तानुग्रहकारकाय नमः । ( भक्त + अनुग्रह )

,, भक्तांवर अनुग्रह ( कृपा ) करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४५ ,, शरणागतवत्सलाय नमः । ( शरण + आगत )

,, शरण आलेल्यावर प्रेम करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४६ ,, भक्तिशक्तिप्रदाय नमः ।

,, भक्ति व शक्ति देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४७ ॐ ज्ञानवैराग्यदाय नमः ।

,, ज्ञान व वैराग्य देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४८ ,, प्रेमप्रदाय नमः ।

,, प्रेम देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

४९ ,, संशयहृदयदौर्बल्यपापकर्मवासना क्षयकराय नमः ।

,, ( संशय + हृदयदौर्बल्य + पापकर्मवासना + क्षयकराय )

,, संशय, मनाचा दुबळेपणा व पापकर्म करण्याची इच्छा यांचा नाश करणाऱ्या

,, साईनाथानां नमस्कार असो.

५० ,, हृदयग्रन्थिभेदकाय नमः । ( हृदयग्रन्थि + भेदकाय )

,, हृदयाची ग्रन्थि (गांठ) तोडणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

५१ ,, कर्मध्वंसिने नमः ।

,, ( सर्व ) कर्मांचा नाश करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

५२ ,, शुद्धसत्त्वस्थिताय नमः ।

,, शुद्ध सत्व गुणामध्ये ( सदा ) स्थित असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

५३ ,, गुणातीतगुणात्मने नमः ।

,, गुणांच्या पलिकडे असलेल्या व गुण धारण करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

५४ ,, अनन्तकल्याणगुणाय नमः ।

,, अनन्त कल्याण करणाऱ्या गुणरुपी साईनाथानां नमस्कार असो.

५५ ,, अमितपराक्रमाय नमः ।

,, अत्यंत पराक्रमरूपी साईनाथानां नमस्कार असो.

५६ ,, जयिने नमः ।

,, ( सदा ) विजयी अशा साईनाथानां नमस्कार असो.

५७ ,, दुर्धर्षाक्षोभ्याय नमः । (दुर्धर्ष+अक्षोभ्याय)

,, अतीशय दहशत वाटणाऱ्या परंतु ( सहसा ) प्रक्षुब्ध न होऊ शकणाऱ्या

,, साईनाथानां नमस्कार असो.

५८ ,, अपराजिताय नमः ।

,, ( कधीही व कुणाकडूनही ) न हरणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

५९ ॐ त्रिलोकेषु अविघातगतये नमः ।
,, तिन्ही लोकात ज्यांच्या गतीला अडथळा नाही अशा साईनाथानां
,, नमस्कार असो.

६० ,, अशक्यरहिताय नमः ।
,, ( कोणतीही गोष्ट ) अशक्य नसलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

६१ ,, सर्वशक्तिमूर्तये नमः ।
,, मूर्तिमंत सर्व शक्ति अशा साईनाथानां नमस्कार असो.

६२ ,, सुरूपसुन्दराय नमः ।
,, सुरूप व सुंदर अशा साईनाथानां नमस्कार असो.

६३ ,, सुलोचनाय नमः ।
,, सुंदर डोळे असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

६४ ,, बहुरूपविश्वमूर्तये नमः ।
,, मूर्तिमंत बहुरूपी विश्वच असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

६५ ,, अरूपाव्यक्ताय नमः । ( अरूप + अव्यक्त )
,, निराकार व अव्यक्त अशा साईनाथानां नमस्कार असो.

६६ ,, अचिन्त्याय नमः ।
,, ज्यांची कल्पना करता येत नाही अशा साईनाथानां नमस्कार असो.

६७ ,, सूक्ष्माय नमः ।
,, अत्यंत सूक्ष्म अशा साईनाथानां नमस्कार असो.

६८ ,, सर्वान्तर्यामिणे नमः । ( सर्व + अन्तर + यामिणे )
,, सर्वांच्या अन्तःकरणात साक्षीरूपाने असणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

६९ ,, मनोवागतीताय नमः । ( मन + वाक् + अतीताय )
,, मन व वाणी यांच्या पलिकडे असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

७० ,, प्रेममूर्तये नमः ।
,, मूर्तिमंत प्रेमच असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

७१ ,, सुलभदुर्लभाय नमः ।
,, प्राप्त होण्यास सोपा तसाच कठीण अशा साईनाथानां नमस्कार असो.

७२ ॐअसहायसहायाय नमः। (असहाय + सहायाय)
,, ज्याना कोणी मदत करणारे नाही त्याना मदत करणाऱ्या अशा साईनाथानां नमस्कार असो.

७३ ,, अनाथनाथ दीनबंधवे नमः। (अनाथनाथ + दीनबंधवे)
,, अनाथांचा नाथ व दीनांचा बंधु अशा साईनाथानां नमस्कार असो.

७४ ,, सर्वभारभृते नमः।
,, (भक्तांचा) सर्व भार उचलणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

७५ ,, अकर्मानेककर्मसुकर्मिणे नमः। (अकर्म + अनेक + सुकर्मिणे)
,, सर्वांच्या कर्म, वाईट कर्म व चांगल्या कर्मरूपी साईनाथानां नमस्कार असो.

७६ ,, पुण्यश्रवण कीर्तनाय नमः।
,, ज्याच्या बद्दल ऐकणे व ज्याचे वर्णन करणे पुण्यकारक आहे अशा साईनाथानां नमस्कार असो.

७७ ,, तीर्थाय नमः।
,, मूर्तिमंत तीर्थच (पवित्र स्थान) असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

७८ ,, वासुदेवाय नमः।
,, मूर्तिमंत वासुदेवच (श्रीकृष्ण) असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

७९ ,, सता गतये नमः।
,, साधू पुरुषांची गति असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

८० ,, सत्परायणाय नमः।
,, साधू पुरुषांचे अंतीम ध्येय असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

८१ ,, लोकनाथाय नमः।
,, सर्व जगाचा स्वामी अशा साईनाथानां नमस्कार असो.

८२ ,, पावनानधाय नमः।
,, पवित्र आणि पापरहित अशा साईनाथानां नमस्कार असो.

८३ ,, अमृतांशवे नमः। (अमृत + अंशवे)
,, अमृतासारखी किरणे असलेल्या अशा चंद्ररुपी साईनाथानां नमस्कार असो.

८४ ,, भास्करप्रभाय नमः।
,, सूर्यासारखे तेज असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

८५ ॐ ब्रह्मचर्यतपश्चर्यादिसुव्रताय नमः ।
,, ब्रह्मचर्य, तपश्चर्या वगैरे चांगल्या व्रतरूपी साईनाथानां नमस्कार असो.

८६ ,, सत्यधर्मपरायणाय नमः ।
,, सत्य ( खऱ्या ) धर्माच्या ठिकाणी निष्ठा असणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

८७ ,, सिद्धेश्वराय नमः । ( सिद्ध + ईश्वर )
,, सिद्धांचा ईश्वर असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

८८ ,, सिद्धसङ्कल्पाय नमः ।
,, ज्याचे संकल्प नेहमीच सिद्ध होतात अशा साईनाथानां नमस्कार असो.

८९ ,, योगेश्वराय नमः । ( योग + ईश्वर )
,, योग्यांचा ईश्वर असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

९० ,, भगवते नमः ।
,, भगवान् साईनाथानां नमस्कार असो.

९१ ,, भक्तवत्सलाय नमः ।
,, भक्तांवर प्रेम करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

९२ ,, सत्पुरुषाय नमः ।
,, सत्पुरुष अशा साईनाथानां नमस्कार असो.

९३ ,, पुरुषोत्तमाय नमः ।
,, पुरुषांमध्ये उत्तम अशा साईनाथानां नमस्कार असो.

९४ ,, सत्यतत्त्वबोधकाय नमः ।
,, सत्य तत्त्वाचा उपदेश करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

९५ ,, कामादिषड्वैरिध्वंसिने नमः । ( कामादि + षट् + वैरि + ध्वंसिने )
,, काम इत्यादि सहा शत्रुंचा नाश करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

९६ ,, अभेदानन्दानुभवप्रदाय नमः । ( अभेद + आनन्द + अनुभव + प्रदाय )
,, ( ईश्वराशी ) एकरुप होण्याच्या आनंदाचा अनुभव देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

९७ ,, समसर्वमतसंमताय नमः । ( समसर्व + मत + संमताय )
,, सर्व ( प्राणी ) एकसारखेच आहेत अशा मताला संमति असणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

९८ ॐ श्री दक्षिणामूर्तये नमः ।

,, श्री दक्षिणामूर्तिरुपी, दक्षिणेकडे तोंड असलेल्या शिवरूपी साईनाथानां नमस्कार असो.

९९ ,, श्री वेङ्कटेशरमणाय नमः ।

,, श्री वेङ्कटेश हेच ज्याचे सुख आहे त्या साईनाथानां नमस्कार असो.

१०० ,, अभ्दुतानन्दचर्याय नमः । (अभ्दुत + आनन्द + चर्याय)

,, अलौकिक अशा आनंदात वावरणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०१ ,, प्रपन्नार्तिहराय नमः । (प्रपन्न + आर्ति + हराय)

,, शरण आलेल्यांचे दुःख हरण करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०२ ,, संसार सर्व दुःखक्षयकराय नमः ।

,, संसारातील सर्व दुःखाचा नाश करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०३ ,, सर्वावित्सर्वतोमुखाय नमः । (सर्वविद + सर्वतोमुखाय)

,, सर्व जाणणाऱ्या व सर्व ठिकाणी दृष्टि असलेल्या साईनाथानां नमस्कार असो.

१०४ ,, सर्वान्तर्बहिःस्थिताय नमः । (सर्व + अंतर + बहिः + स्थिताय)

,, सर्वांच्या आत व बाहेरही असणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०५ ,, सर्वमङ्ल्लकराय नमः ।

,, सर्व मंगल करणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०६ ,, सर्वाभीष्टप्रदाय नमः । ( सर्व + अभिष्ट + प्रदाय )

,, सर्व इच्छित वस्तु देणाऱ्या साईनाथानां नमस्कार असो.

१०७ ,, समरससन्मार्गस्थापनाय नमः ।

,, सर्वांवर सारखे प्रेम करण्याचा सन्मार्ग स्थापन करणाऱ्या साईनाथाना नमस्कार असो.

१०८ ,, श्री समर्थसद्‌गुरुसाईनाथाय नमः ।

,, श्रीसमर्थ व सद्‌गुरु अशा साईनाथानां नमस्कार असो.

☆

# तुमचे साईविषयक सामान्य ज्ञान किती आहे.

१) ...... यांनी माधवरावांना रेशीमकाठी धोतर दिले.

अ) दिक्षित, ब) चांदोरकर, क) आनंदराव पाखाडे ड) धरमसी.

२) द्वारकामाईतील बाबांचा फोटो ...... यांनी रेखाटला.

अ) भाटे, ब) तुलकर, क) जयकर, ड) बोरावके

३) अपना तकीया छोडना नहीं असे बाबा ...... म्हणाले.

अ) पंताना, ब) दासगणूना, क) मेघाला. ड) साठ्यांना.

४) 'चिंधी चोर' असे बाबा ...... म्हणाले.

अ) बुटीना, ब) विजयानंदाना क) देवांना ड) रामलालला.

५) बाबांच्या डाव्या बाजूला ...... जेवावयास नेहमी बसत.

अ) अमीर सक्कर ब) बडेबाबा, क) अबदुलबाबा, ड) दिक्षित.

६) पुणे स्टेशनवर बाबा कुणब्याच्या वेशात ...... भेटले.

अ) मानकराना ब) रामलालला, क) राघू पाटलाना ड). देवांना

७) ...... बाबांच्या स्नानाचे पाणी पिऊन रहात असे.

अ) मेघा, ब) नेवासकर क) म्हाळसापती ड) रामदासी.

८) ...... दिवशी बाबांनी आपले अंगावरील सर्व कपडे उतरून ते धुनीला अर्पण केले.

अ) पाडव्याच्या ब) दिवाळीच्या क) दसऱ्याच्या ड) रामनवमीच्या

९) मेघांनी बाबांना ...... च्या दिवशी सचैल स्नान घातले.

अ) आषाढी एकादशी ब) संक्रांत क) गुरु पौर्णीमा ड) भाऊ बीज

१०) बाबांनी पितळयांना ...... रुपये दिले.

अ) सहा ब) पाच क) नऊ ड) तीन

—प्रेषक–श्री. माधव गोरे
विनायक बाग; बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला, मुंबई ४०००७०

उत्तरे

१)–क, २)–क, ३)–अ, ४)–क, ५)–ब
६)–अ, ७)–ब, ८)–क, ९)–ब, १०)–ड,

महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचे

# शिरडीचे नवे अत्याधुनिक भोजनगृह

● महाराष्ट्रात जी संस्थानी तीर्थक्षेत्रे म्हणून आहेत त्या सर्वात श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे श्रीसाईबाबांचे पावन क्षेत्र जगप्रसिद्ध आहे. या तीर्थक्षेत्राला जोडूनच संस्थान भक्तांच्या भोजन व निवासाची पण व्यवस्था करते. ही व्यवस्था कितीही जरी केली तरी भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे ती नेहमीच अपुरी पडत असते

भक्तांसाठी अगदी अलिकडे श्रीसाईबाबा संस्थानने बांधलेले नवे भोजनगृह हे विशालतेच्या दृष्टीने महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचे व भारतातील द्वितीय क्रमांकाचे ठरणार आहे. या नूतन भोजन गृहाचा गृहप्रवेश समारंभ गुरुवार दिनांक २४ जुलै रोजी सकाळी ९ वाजता संस्थानचे न्यायालयधारक श्री. क. हि. काकरेसाहेब यांनी केलेल्या मंगल पूजनाने करण्यात आला.

संस्थानच्या या अत्याधुनिक भोजनगृहाने २५००० चौरस फूटाचे क्षेत्र व्यापलेले आहे. या भोजन गृहाचे भव्य दालन दहा हजार चौरस फूटाचे आहे. संस्थानच्या जुन्या भोजन गृहातल्या दालनात टेबल खुर्चीवर एकावेळी १६० भोजन भाऊ बसत असत. या नव्या भोजन गृहात एकावेळी १९२ स्टेनलेस स्टीलचा पत्रा वरून ठोकलेल्या टेबल-बाकावरून ८५० भोजनी बसू शकतात. उत्सव काळात भारतीय बैठक जर मांडली तर एकावेळी पंगतीत १२०० लोक भोजनास बसतात. या भोजनगृहात ५०×५० फूटाचे प्रतिक्षागृह आहे. भोजन दालनात जर जागा नसेल तर इच्छूक क्रमवार या ठिकाणी थांबू शकतात. या भोजनगृहाला लागूनच अद्यावत स्वयंपाकगृह, नैवेद्यकोठी, शीतगृह, धान्याचे कोठार, साठा कोठी, भाजी पाला कोठी, भांडी कोठी इ. विशाल खोल्या असून भोजन गृहाची मुख्य कचेरी व त्याला लागूनच तिकीट विक्री कचेरी पण आहे. या अवाढव्य भोजन गृहात ११० पंखे असून असंख्य नळीचे दिवे आहेत. रात्रीच्यावेळी हे भोजनगृह या दिव्यांच्या प्रकाशात लख्ख उजळून निघते.

तळमजल्यास असलेल्या या प्रचंड भोजनगृहावर तीन मजले उठविले जाणार आहेत. प्रत्येक मजल्यावर अद्यावत सुखसोयींनी सुसज्ज असे ब्लॉक्स तयार करण्यात येत असून एकंदर ७५ ब्लॉक्स या टोलेजंगी इमारतीत होतील. प्रत्येक ब्लॉक १८×१२ चा असून त्याला जोडून च २४ तास पाणी असलेले स्नानगृह व ६×४ ची

बाल्कनी आहे. प्रत्येक मजल्यावरील २५ ब्लॉक्सना मिळून १२ संडास-पायखाने वेगळे करण्यात आले आहेत. हे सारे ब्लॉक्स भक्तांना रहाण्यासाठी म्हणून दिले जाणार आहेत. २५ ब्लॉक्स शिवाय भक्तांना लागणाऱ्या बादल्या, कॉटस्, गाद्या, उशा, पांघरुणे व अंथरुण इ. सामानासाठी २ अलग कोठ्या आहेत. भोजनगृहात स्वयंपाकाचे पदार्थ शिजविण्यासाठी गॅस व डिझेलच्या इंधनाच्या विद्युत भट्टयांप्रमाणेच लाकूडफाट्याच्या जळणाच्या पण भट्टया आहेत.

भोजन गृहात एवढ्या मंडळींना भोजन पदार्थ वाढण्यासाठी म्हणून ढकल-गाड्यांची सोय केली जात आहे. यामुळे वाढप्यांची शक्ती व वेळ वाचणार आहे. भोजनगृहात आता ताटातून भोजन वाढले जात नाही तर प्रत्येक पदार्थासाठी वेगवेगळी जागा (डाळ पात्र, भाजी पात्र) एकत्रच असलेल्या स्टेनलेस स्टीलच्या प्लेटस पुरविल्या जातात.

भोजनगृहासहित या संपूर्ण तीन मजली इमारतीला बांधणीसाठी खर्च एकंदर ११ लाख रु. आला असून ती मुंबईच्या श्री. वालजीभाई गज्जर यांच्या नवजीवन कन्स्ट्रक्शनने श्री. आर. पी. तलगिरी व श्री. एस. के. आठल्ये या नामांकीत वास्तुशास्त्रज्ञाच्या सल्ला नि मार्गदर्शनाखाली बांधलेली आहे. इमारतीच्या बांधकामावर संपूर्ण देखरेख संस्थानचे स्थानीय स्थापत्य शास्त्रज्ञ अभियंता श्री. डी. सी. पाटील यांची होती. या नूतन भोजनगृहाची योजनासिद्ध आखणी आणि रुपरेषा माजी कोर्टरिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांच्या कारकिर्दीत करण्यात आली होती. विद्यमान न्यायालय धारक साहेब श्री. क. हि. काकरे यांच्या कारकीर्दीत तयार झालेली ही भव्य वास्तू संस्थानचे एक आकर्षण ठरली आहे.

# मी साई भक्त कसा झालो

—श्री. मानसिंगराव फडतरे
आदर्श कमर्शियल इनस्टिटयूट
टिळकनगर रोड, चेंबुर, मुंबई ८९

● मुंबई मधील चेंबुर उपनगरात आमचे टायपराईटींग इनस्टिटयूट आहे. एके दिवशी रात्री ९–३० नंतर मी पान खाऊन येत होतो. इनस्टिटयूट बंद झाली होती. सोबत माझा मोठा मुलगा चि. जय होता ( २ वर्षांचा ) माझे मोठे बंधुराज खुर्चीत बसले होते. माझ्या कडेला जय असल्यामुळे मी खाली बघत बघत चालू शकलो नाही. बंधुराज बसले होते तेथपर्यंत मी पोहचतोय न पोहचतोय तोच माझ्या पायाला काही तरी लागले आणि त्याचा आवाज हारवादे नाणे पडल्या नंतर जसा होतो तसा झाला. मी खाली वाकलो आणि पाहीले तर एक पितळेची आंगठी आणि ती सुद्धा साईबाबांच्या प्रतीमेची मी लगेच ती आंगठी उचलून घेतली कपाळाला लावली आणि बोटात घातली आणि तेव्हापासून मी साई भक्त झालो. तेव्हा पासून श्री बाबांच्यावर माझी श्रद्धा जडली. आजही ती आंगठी माझ्या बोटात आहे.

ही घटना घडण्याच्या अगोदर माझी मोठी बहिण मला कित्येक वेळा बोलली की आपण शिर्डीला जाऊ या, शिर्डीला जाऊया. परंतु माझ्या मनात कधीच यायचे, नाही की आपण शिर्डीला जावे. बाबांचे दर्शन घ्यावे. ही घटना घडल्या नंतर मी २ । ३ वेळा शिर्डीला जाऊन आलो. एक वेळ बहिण तिची मुलं आणि यजमानां समवेत गेलो. पहा बाबांची अगाध लीला ! बहिणीला दर्शन देण्यासाठी मला आपला भक्त करावा लागला. जेव्हा जेव्हा बाबा मला बोलवतात तेव्हा तेव्हा मी जात असतो.

# जात्यावर दळताना म्हटल्या जाणाऱ्या

## श्रीसाईबाबांच्या संबंधीच्या ओव्या

[ शिरडीत साईबाबांचे वास्तव्य असताना तेथील गृहिणी जात्यावर दळण कांडण करताना ओव्या म्हणत. त्या ओव्यातून बाबांची थोरवी, महिमा गुंफलेला असे अशा काही जात्यावरील ओव्या मोठ्या प्रयासाने शिरडी निवासी साईभक्त महिला सौ. लीलाताई मुळे यांनी संग्रहीत केल्या आहेत. त्या येथे देत आहोत. आमच्या वाचकांना त्या मनोरंजक व संग्राह्य वाटतील. का. संपादक ]

### या ओव्या बाबांच्या हयातीत असलेल्या

१) शिरडी सासर होते माझे ग दैवात ।
साईबाबा माझा राजा शिरडीच्या शिवारात ॥

२) शिरडी सासर दैव तुझ ग भारी नारी ।
पाण्याच्या दिव्यांनी सजविली द्वारकापुरी ॥

३) शिरडी सासर दणाणल्या साऱ्या पेठा ।
साईराज्या तुझ्या लीला वर्णाव्या किती मोठ्या ॥

४) शिरडीच्या शिवारात दिले ग बापांनी ।
येथे आहे साईराजा त्याची अमृताची वाणी ॥

५) बाबांची भिक्षा येते तुझ्या ग दाराशी ।
घाल भिक्षा देई पाणी नको ठेवू ग उपाशी ॥

६) साईराज्या माझ्या तुला हृष्ट होती फार ।
आई-बापा विन आले पोरक्याचे पोर ॥

७) सोन्यावाणी कांती दिसती साईराजा ।
लिंब लोण करू दे ग मोठा गमतीचा राजा ॥

८) दिसला कळस साईराजाच्या राऊळाचा ।
दर्शना जाऊ चला शिरडी राजाच्या ॥

९) साईबाबांचे देऊळ कोण गृहस्थ पुजतो ।
कोपरगावातून यांचा कळस ग दिसतो ॥

१०) गाव ग शिरडीच्या माळणी रमा ठमा ।
अस साईबाबाला फूलांचा ग पायजमा ॥
११) जाईच्या फूलाचा मी तर करते उगा निगा ।
साईराजा तुझ्या रे करते हार गळया जोगा ॥
१२) अस जाईच्या फुलानी वाडा दरवळला माझा ।
अस देव साईबाबा शेजारी बाग तुझा ॥
१३) अमी हंड्यावर चरी दर्शन घेते जाता जाताला ।
येत गाव ते शिरडी कोण्या भाग्याच्या गोताला ॥
१४) बाबांच्या राऊळाला चांदीच्या ग पेट्या ।
उदीच्या या ग पुड्या गेल्या मद्रासाला चिठ्या ॥
१५) पालखी निघाली पुढे वाजतो ग बाजा ।
उठ सई बाई ओवाळू दे ग त्या ग राजा ॥

—सौ. उषा प्र. मुळे
साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी.

# साईनाथ देवा

साईनाथ देवा घडो तुझी सेवा
हाची मज ठेवा जन्मो जन्मी द्यावा
नको लावू मज धन आणि आस
पती माझा राहो तूज पायी लीन
नको माझा करु कदापी अव्हेर
तुची आहे माझा जगी सर्व थोर ।
किती ऐकू तुमची अगाध हो लीला
मी मूढ तीला । दर्प पुष्प माला ।
सदाशीव आहे । कैलासीचा राजा
भजते मी त्याची रात्र दीन माला
कैसी घडविली । शिरडीची वारी
त्याला तुची मोठा आहे । लीला नाटक धारी
काय वर्णू तुमची । अगाध हो गाथा
चरण तळी राहो पापीणीचा माथा

—सौ. तारा चेंदवणकर,
राधा माधव, चेंबुर

# चराचरी भरूनी उरला....

दोन वर्षापूर्वी साठ, अपुला, संपविला अवतार
चराचरी भरूनी उरला साई, विश्वंभर ॥ धृ० ॥

हांक मारीता, धावुनी येई
भक्त रक्षण्या, तत्पर राही
श्रद्धेने जे विनविती त्यांचा वाही शिरी भार ॥ १ ॥

हिंदु असो वा, कुणी मुस्लीम
शीख पारशी, किंवा ख्रिश्चन
प्रेमभावे येती त्यांसी खुला; शिर्डी दरबार ॥ २ ॥

साई-भजनी तन्मय होती
भवसागरी, तरूनी जाती
'उदी'त गवसे साईकृपे त्या, अमृताची धार ॥ ३ ॥

बोल साईचे "श्रद्धा-सबुरी"
"सबका मालीक, एक" मुरारी
दे तयाची, सकला प्रचिती, दया सिंधुसागर ॥ ४ ॥

—श्री. विजय द. हजारे, एम. ए.
सी।६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली–पूर्व, मुंबई नं. ४००,०६६

★ ★ ★

# ती उदी (अंगारा)

लाविता उदी ती भाळी ।
साईनाथ नित्य सांभाळी ।। धृ ।।

साईचा जिथे हो वास ।
नित्य जे भजती तयास ।।
तो भक्त प्रिय साईस ।
साईनाथ संकटे टाळी ।। १ ।।

शिरडीस नाथ ते असती
जन भावे तयासी पूजिती ।
भक्तगणा भेट ते देती
सोडवी माया मोह जाळी ।। २ ।।

मंदिरी मूर्ति बाबांची
धूनी ही तिथे ती त्यांची ।
ती महानता त्या स्थानाची
हाकेसरसी येती जवळी ।। ३ ।।

साईराणा त्या शिरडीचा
मेळा तिथे भाविकांचा ।
पुरवी हेतू ते मनीचा
साईनामे वाजता टाळी ।। ४ ।।

—श्री. स. मा. मुऱ्हार
चंदननगर, मेडीकल रोड, नागपूर

# * आरती शिरडीपतीची *

आरती शिरडीपति
सुख आणि शांती देती ॥ धृ ॥

तू सकळ जनांचा ।
आहे मायबाप ।
उठोनिया प्रभाती ।
नमन तुज करिती ।
आरती शिरडीपति ॥ १ ॥

जे येती तुझे शरण ।
करी तयांचे दुःखहरण ।
मनी धरी जैसा भाव ।
करी तैसी ही प्रिती ।
आरती शिरडीपति ॥ २ ॥

—सौ. वैशाली आनंद हिंदळेकर
२०९/ओ इंडियन ऑईलनगर
जयप्रकाश रोड, अंधेरी ( पश्चिम)
मुंबई नं. ४०० ०५८

# श्रीसाईगीत तुषार

—श्री. सुहास देसाई, मुंबई

दत्तात्रेयाचा औदुंबर श्री शंकराचा बेल तर भगवान बुद्धाचा बोधिसत्व पिंपळ. खरोखर ईश्वराला सुद्धा निसर्ग प्रेम आहे. शिर्डीचा लिंब म्हणजे साक्षात् कल्पवृक्ष ईश्वरी सहवास मिळून पवित्र झालेला महान योगी, महान तपस्वी, त्याच्याच मुळांशी तेवणाऱ्या चार ज्योति व सद्गुरुचे आसन श्री साईंनी जगाला दाखविले. पण हा गुरु कोण कुठला हे आज पर्यंत कोणाला कधीही कळले नाही, आणि त्याच जागेवर श्रीसाईंनी बारा वर्षे तप केले. दर गुरुवारी त्या जागेवर धूप जाळल्याने इप्सित मनोकामना पूर्ण होतील असा साईचा दिव्य संदेश आहे. चंदनाच्या सहवासाने बोरीच्या झाडाला पण सुगंध येतो. तद्वत जन्मताच कडू असणारा लिंब श्रीसाईच्या सहवासाने गोड झाला. जगाला साईचमत्कार दाखवण्यासाठी वर्षानुवर्षे अजून तिष्ठत उभा आहे जगाच्या अंतापर्यंत.

---

## शिर्डी क्षेत्री लिंबरुपाने औदुंबर प्रगटला—३

दिव्य ज्योति अजून तेवती साई दावि सकळा ॥ धृ. ॥

मान पहिला परम पित्याला
लिंबवृक्षा खाली लाभला
असे समाधी तळ घराला
पावन होईल क्षेत्र उद्याला

साई बैसती मना चिंतिती, मनो कामना पूर्ण करीता ॥ १ ॥

खोल भुयार असे भूमिला
आसन आहे ज्ञात साईला
वंदन करुनी त्या जागेला
बारा वर्षे बसे तपाला

आत तेवती चार ज्योत चार वेद ते अमर रहाती ॥ २ ॥

प्रथम साईनी धूप जाळीला
प्रेम भावे आळवी पित्याला
त्या जागेवर पार बांधला
गुरुस्थान हे सांगे जगाला

दर गुरुवारी धूप जाळीता, सकल मनोरथ पूर्ण पावती ॥ ३ ॥

गुरु कोण तो कधी न पाहिला
स्थान लाभले आज शिर्डीला
प्रथम दर्शन करीती त्याला
मान पहिला मिळे गुरुला

कडू पाने गोड होती, नव्हे लिंब हा कल्पभासती

☆ ☆ ☆

श्रीसाईंच्या जीवनात शिर्डीला अत्यंत महत्त्व होते. शिर्डीत आल्यावर त्यांना भक्त भेटले. ते म्हाळसापती नागरे व काशिराम शिंपी आणि त्यांनीच श्रीसाईंना मोडक्या मशिदीत रहावयास विनंति केली. आणि शेवटपर्यंत तेथेच राहिले ह्या मशिदीचे भाग्य थोर म्हणून तिचे आज मंदिर झाले. जगातील शेकडो साई भक्तांचे पवित्र असे श्रद्धास्थान बनले, आणि श्रीसाईंनी प्रज्वलीत केलेली त्यातील धूनी अजुन पेटते आहे. जगाच्या अंतापर्यंत ती प्रज्वलीत राहिल. परंतु मशिद आणि अग्नी हे कसे शक्य आहे. पण म्हणतात ना "संताच्या घरच्या उलटया खुणा मशिदीने अग्नीचा स्वीकार केला. त्या श्रीसाई शंकरासाठी आणि त्या मशिदीत जीर्ण चिंध्याच्या गाठी मारून एक फळी लटकत होती, व त्यावर चार टोकाला चार पणत्या लावून श्रीसाई शांत झोप घेत. पहाणाऱ्या सर्वांना वाटे जणू काही सप्त सागरात शेषनारायणच पहूडला आहे. जीर्ण झालेल्या त्या चिंद्या फळीचे वजन घेण्यास असमर्थ होत्या तर साई सह फळी धुनिवर कशी लोंबकळत असे हे रहस्य आज पर्यंत कोणालाच कळले नाही. कारण ते आपल्या सर्वांच्या बुद्धीच्या पलीकडचे आहे.

# दिली रहावया मशिद मोडकी, सुदाम्याची झोपडी–४

साई कृपेने अमर जाहली, धन्य द्वारकामाई ॥ धृ० ॥

म्हाळसापती काशिराम शिंपी
दोघे असती बाबा भवती
भक्त पहिले साई भेटती
मशिदीमध्ये घेवून जाती
प्रथम चरण ते साई ठेवती, सुरू झाली पुण्याई ॥ १ ॥

मशिदीमध्ये दिन आचरता
नित्य कर्म ते असे सर्वदा
भक्त येती तेथे भेटती
सुख दुःखाची होय सांगता
मशिदीचे मंदिर करीती, पवित्र झाली गोदाई ॥ २ ॥

मशिदीमध्ये धुनी निर्मिति
योग शक्तीची येई जागृती
सांब सदाशिव साई भासती
चिलीम ओढण्या तल्लीन होती
अजून धूनीची ज्योत तेवती, मशिद अग्नी घेई ॥ ३ ॥

साई झोपती धुनी वरती
अजब सारी किमया करीती
जीर्ण चिंध्या बांधून वरती
दिड फुटाची फळी छान ती
चार दिप ते लावी भोवती, साई झोप घेई ॥ ४ ॥

भिक्षापात्र ते घेई हाती
भक्त जनांच्या दारी जाती
अल्ला मालीक म्हणून बोलती
भिक्षा घेवून पुढे चालती
मिळे अन्न ते सारे वाटती, अन्न क्षेत्र होई ॥ ५ ॥

# श्रीसाई कृपा

। साई मंदिरी मी आलो ।
। क्षणात पावन झालो ॥ १ ॥

। भान हरपले, सार्थक झाले ।
। चरणी जीवन विलीन झाले ॥ २ ॥

। आंतर्यामी वास करी ।
। सदैव माझ्यासंगे साई ॥ ३ ॥

। सुप्त भावना नुरली आता ।
। पुनर्जन्म नको मज मुक्ति मिळता ॥ ४ ॥

। होईन मी उतराई । साई ।
। होईन मी उतराई ॥ ५ ॥

। मानव जन्म दिलास मजला ।
। भक्तिचा मार्ग दाविला ॥ ६ ॥

। तव सेवेचा लाभ मिळाला ।
। जीवन, सत्संग सफल जाहला ॥ ७ ॥

। एक रुप मी झालो साई ।
। केलास मला उतराई । साई ॥ ८ ॥

। केलास मला उतराई ।

— डॉ. ग. स. कामत,
११९४/१३ प्रसाद बंगला,
शिवाजीनगर पुणे ५.

☆ ☆ ☆

# असे हे शिर्डी साईनाथ

साईनाथ शिर्डीत प्रगटले
भक्तांचा विश्वास
असे हे शिर्डी साईनाथ ॥ धृ० ॥

भक्ती तुमची करता आता
दर्शन द्यावे साईनाथा
तुच आम्हाला सांभाळावे
द्यावा मोद मनास
असे हे शिर्डी साईनाथ ॥ १ ॥

दैव आमुचे तुमच्या हाती
पापे सगळी जळून जाती
मुक्त करावे या संसारी
मुक्ती द्यावी आम्हास
असे हे शिर्डी साईनाथ ॥ २ ॥

दरबारी मी तुमच्या आलो
तुमच्या चरणी लीनच झालो
हीच प्रार्थना तुम्हास बाबा
द्यावा आशीर्वाद
असे हे शिर्डी साईनाथ ॥ ३ ॥

अपराधी मी तुमचा बाबा
द्यावा मम सुखाचा ठेवा
मन हे गुंतले तुमच्या चरणी
द्यावा तव सहवास
असे हे शिर्डी साईनाथ ॥ ४ ॥

—श्री. अरुण ह. खडकीकर
घ. नं. २३-५-८३५/१
अलका टॉकीज समोर
शालीबंडा हैद्राबाद ( आं. प्र. )

# श्रीसाईपरिवार–वृत्तविशेष

## साईनिकेतनमधील गुरुपौर्णिमा उत्सव

सर्व साईभक्तांची इच्छा शक्य तोवर गुरुपौर्णिमेसाठी शिर्डीस जाण्याची असते; परंतु सर्वांनाच ते शक्य होत नाही. "ज्या ज्या ठिकाणी माझे भक्त माझी आठवण काढतील, त्या त्या ठिकाणी मी उपस्थित असेन" ह्या साईबाबांच्या आश्वासनानुसार ज्या भक्तांना शिर्डीस जाणे शक्य होत नाही ते आपल्या जवळ असलेल्या साईमंदिरात जाऊन गुरुपौर्णिमेस बाबांचे दर्शन घेऊन तो उत्सव साजरा करीत असतात. दादर येथील साईनिकेतनमध्ये दर गुरुवारी साईभक्तांची पुष्कळ गर्दी होत असते, तेव्हा हे सर्व आणि इतरही बरेच भक्त गुरुपौर्णिमेस साईनिकेतनमध्ये येणार हे जाणूनच रविवार दिनांक २७-७-८० ला सकाळी आठ वाजल्यापासून ऑफीस उघडे ठेवण्यात आले होते व तेव्हापासूनच भक्तांची रांग दर्शनासाठी लागली होती. दुपारी बरोबर बारा वाजता आरतीची वेळ असते हे लक्षात घेऊन बरेच भक्त त्याच सुमारास आले होते. त्यामुळे दुपारी बारा वाजता आरतीला सुमारे २५० लोक उपस्थित होते. आरतीनंतर सर्व लोकांना प्रसाद वाटण्यात आला. दर्शनासाठी रात्री आठ वाजेपर्यंत ऑफीस उघडे ठेवण्यात आले होते आणि साईभक्त येऊन दर्शन घेऊन जात होते. सबंध दिवसामध्ये एकूण दोन हजारावर साईभक्तांनी त्या दिवशी दर्शनाचा लाभ घेतला.

---

## श्री. शिंत्रे यांना 'ज्योतिष विशारद'

साईभक्त श्री. चिंतामण लक्ष्मण उर्फ नानासाहेब शिंत्रे, चेंबुर यांना पुणे येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय परीषदेत फलादेश मंडळातर्फे 'ज्योतिष विशारद' ही बहुमानाची पदवी देण्यात आली. तसेच त्यांची ६१ वी साजरी करण्यात येऊन त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतण्यात आले.

---

## श्रीमती सांडभोर यांना ७५ पूर्ण

पुण्याचे साईभक्त भारुडकार श्री. रघुनाथराव बाबुराव सांडभोर यांच्या प्रेमळ मातोश्री गं. भा. यमुनाबाई यांना १०-९-१९८० रोजी ७५ वर्षे पूर्ण होऊन त्यांनी ७६ व्या वर्षात पदार्पण केले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. १९३८ साली त्याचे पती श्री. बाबूरावजी शिरडीला गेले तेव्हा श्री. नानासाहेब रासने यांनी त्यांना श्रीबाबांचे एक छायाचित्रे दिले तेंव्हापासून त्यांच्या घरात श्री बाबांची आरती चालते. स्वतः यमुनाताई १९४३ पासून साईभक्तीत लीन आहेत. साईभक्तीमुळे आपणाला मनःशांती लाभते असे त्यांचे सांगणे आहे. श्रीसाई त्यांना दिर्घायुरारोग्य देवो.

## (शिरडीचे श्रीसाईबाबा या चित्रपटाचे समीक्षण)

—डॉ. अ. का. पाठक, पाठकवाडी, गोरेगाव

श्री. जगदगुरु शंकराचार्यांच्या शृंगेरी मठानंतर शिरडीचे महात्म्य आज भारतात सर्वमान्य झाले आहे. शिरडी प्रमाणे शेगावही आजकाळचे तीर्थस्थान आहे. शृंगेरी, शिरडी व शेगाव ही आजची त्रिस्थळी यात्रा आहे. मक्का, मदिना, मीनांची त्रिस्थळी यात्रा आज अशक्य असली तरी भारतीयांना शृंगेरी, शिरडी, शेगाव ही त्रिस्थळी यात्रा मात्र सहज शक्य आहे. द्वारकापीठ स्थापन करणारे शंकराचार्य जगप्रसिद्ध झाले तर द्वारकामाई स्थापन करून साईबाबा विश्वप्रसिद्ध झाले आहेत.

मच्छिंद्रनाथ, जालंदरनाथ, गोरखनाथ, कानीफनाथ वगैरे योगीराजांचे अपूर्ण कार्य आज साईनाथ पूर्ण करित आहेत. आदिनाथांचा आशीर्वाद प्राप्त झालेले साईनाथ दिन-दलितांचे वाली आहेत. अनाथांचे ते नाथ आहेत. गरीबांचे ते एकमेव नाथ म्हणून एकनाथ आहेत. अशा प्रभावी अद्वितीय नाथांचे चित्रिकरण करणे म्हणजे मामुली गोष्ट नव्हे. पण गुजगोष्टी करत प्रभावीपणे साईचरित्र रेखाटण्याची किमया नंदादीप चित्र संस्थेने केली.

हेमाडपंत श्री. दाभोलकर रचित 'श्रीसाईसत चरित' हा 'शिरडीचे साईबाबा' ह्या चित्रपटाचा पाया आहे. ह्या अनमोल ग्रंथास प्रत्यक्ष साईबाबांनी आशीर्वाद दिले आहेत म्हणजेच अप्रत्यक्ष रित्या ह्या चित्रपटासही हे बाबांचे आशीर्वाद प्राप्त झाले आहेत. राजकमलच्या तज्ञ कारागीरांचे तांत्रीक कौशल्य उपयुक्त ठरले आहे. कुमारसेन समर्थांचे समर्थ दिग्दर्शन लाभलेला हा चिटपट प्रभावी व परिणामकारक झाला आहे.

ज्यांच्या चरित्राचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात त्या चारित्र्यवान संताच्या चरित्राचे चित्रिकरण सफलतेने करणे कष्टमय ठरले. पण तार्किक साखळी साधून सार मांडण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. असार जगतात हा कथासार खरोखरीच सरस ठरला आहे कलावंतांच्या कष्टामुळे हा मराठी चित्रपट हिंदी चित्रपटावर मात करीत आहे. साईबाबांची भूमिका साईभक्तांच्या मनावर अजर, अमर प्रतिमा निर्माण करते, असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते.


कै. दत्तोपंत आंग्रेची साईबाबांची भूमिका पाहून संत तुकाराम मधील कै. विष्णूपंत पागनिसांच्या भूमिकेची आठवण झाली. ही भूमिका प्रेक्षकांच्या मनावर भरीव, व

भावूक व भक्तिमय प्रभाव टाकते. भावुक पण ठसकेदार बायजाबाई इंदिरा चिटणीसांनी प्रेक्षका समोर उभी केली आहे. सोज्वळ, साजुक-नाजुक पण भावुक अशी चांदोरकरांची सुपुत्री मैना सुप्रसिद्ध चित्राने प्रेक्षकांसमोर मांडली आहे. धुमाळ, मधु आपटेंची विनोदी जोडगोळी दिगंबर शास्त्री व बाळंभट रुपात धमाल उडवून देत आहे. कै. दादासाहेब साळवी, मामलेदार चांदोरकर रुपे चमकले आहेत. ह्या सर्व गुणी कलावंता समवेत गुणवंत रणजीत बुधकरही चित्रपटात आहेत.

निर्माते कै. केशवराव साठे व संगीत दिग्दर्शक पांडुरंगराव दीक्षित ह्यांनी आपली कला श्री साईबाबा चरणी समर्पित केली आहे. समर्थ दिग्दर्शक कुमारसेन समर्थांनी आपले दिग्दर्शन सामर्थ्य ह्या चित्रपटात पणास लावले आहे, व हा पण आता श्री दत्त फिल्मसचे श्री. शरद गाळवणकर समर्थपणे हाताळित आहेत कारण ह्या चित्रपटाचे वितरण हक्क त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

'ओम' व 'अल्ला हो अकबर'ची घोषणा करीत चित्रपट चालू होतो. एका अंधास दृष्टीलाभ होतो ह्या दृश्याने कथानक सुरू होते. चांदभाईची घोडी पाहिल्यावर तर प्रेक्षकांच्या मनात चमत्कारांची कोडी तयार होतात. पण ही कोडी मानवताधर्माचे व भक्तीमार्गाचे प्रभावी प्रदर्शन प्रगट झाल्यावर बिजली वेगाने सुटू लागतात. साईनाथ दगड फेकतात व एका दगडावर मध्यंतराची पाटी झळकते, हे तंत्र मंत्रमुग्ध करते. पाण्याच्या पणत्यांचा प्रसंग व पटकीच्या साथीचा प्रसंग मनास चटका लावून जातात.

'शिरडी माझे पंढरपूर, साईबाबा रमावर' हे गाणे गुणगुणत प्रेक्षक प्रेक्षागृहाबाहेर येतात. अशी परिणामकारक गाणी ह्या चित्रपटात आहेत. शेवटी मार्मिकपणे बाबांचे उपदेश प्रेक्षकांसमोर मांडले जातात. 'श्रद्धा, सबुरी' हे दिव्य संदेश प्रेक्षकास प्राप्त होतात. मृत्यु हा मानवास येणारच कारण तो मर्त्य आहे. जे निर्माण होते ते नासते, हा निसर्गाचा नियम आहे. म्हणून मनुष्याने मृत्युचे भय ठेवू नये. भूक प्राणीमात्रात प्रगल्भ असते. मुक्या जनावरावर दया करा व मुके आशीर्वाद घ्या दीन, दुबळयांची सेवा हीच देवाची सेवा होय, असे बोध सुबोधरित्या चित्रपटात प्रगट होतात. कथांची निवड चांगली असल्यामुळे सवड काढून जरूर चित्रपट पहावा. भूमिकांशी समरस होऊन कलावंतानी भक्तीरस निर्माण केला आहे. तंत्र शास्त्रानुसार ४-२ दोष असतील पण विविध गुणामुळे चित्रपट सरस ठरला आहे. समाधी प्रसंगी ४-२ अश्रू प्रेक्षकांना येतातच असा हा मार्मिक पण धार्मिक चित्रपट खरोखरीच कौतुकास्पद ठरतो.



# शिरडी-वृत्त माहे जुलै सन १९८०

## —गुरुपौर्णिमा उत्सव—

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता आलेल्या साईभक्तांची व श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा भक्तांची फारच गर्दी झाली होती. हा उत्सव शनिवार दि. २६-७-८० ते सोमवार दि. २८-७-८० पर्यंत तीन दिवस समाधी मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला. नामांकित कलाकार सौ. अनुराधा पौडवाल मुंबई, श्री. जयवंत कुलकर्णी मुंबई, कु. श्रीकला हतगंडी मुंबई, श्री. आप्पा सामंत मुंबई, श्री. भालचंद्र पेंढारकर मुंबई, श्री. शामसुंदर भेडा संगमनेर वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या व ह. भ. प. श्री गंगाधर बुवा व्यास पुणे यांचे कीर्तन झाले.

**गुरुपौर्णिमा उत्सव**:—पहिला दिवस:—शनिवार दि. २६-७-८० रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाल्यावर सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. श्रींचे मंगलस्नान अभिषेक पूजा आरती वगैरे नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधर बुवा नरहर बुवा व्यास पुणे यांचे कीर्तन रात्रौ ७-३० ते ९-०० पर्यंत सौ. अनुराधा पौडवाल, आकाशवाणी कलाकार मुंबई यांचे गायन झाले. ९-१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. रात्रौ ९-३० ते ११-०० पर्यंत श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टी मुंबई यांचा कार्यक्रम झाला. ११-१५ ला श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस**:—रविवार २७-७-८० रोजी पहाटे ५ वा, मंदिर उघडले. रविवार सुट्टीचा दिवस व उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे साईभक्तांची गर्दी अतिशय होती. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्याय वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधि-मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधरबुवा व्यास यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७ वा. धुपारती झाल्यावर रात्रौ ९-१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक, साईनाम घोषात वाद्यांच्या गजरात समाधि मंदिरातून निघाली. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक राहाता बॅण्ड पथक, सनई-चौघडा शिंगवादन, डफ, ढोल, टाळ मृदंग, भजन, भक्ताचे गायन भजन, अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला.

त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी व ग्रामस्थ लोकांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर मिरवणूक मंदिरात रात्री १२-२५ ला आली व मिरवणूकीतील लोक कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाले. नामांकित कलाकार श्री. वसंतराव देवळणकर, श्री. दैठणकर, श्री. जाधव, श्री. दामूअण्णा दळवी श्री. राजाभाऊ देशपांडे, श्री. भेडा, श्री. जयवंत कुलकर्णी, श्री. लोणकर, श्री. खळदकर वगैरे कलाकारांनी रात्रभर कार्यक्रम केले. साईभक्तांकरिता दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवसः**—सोमवार दि. २८-७-८० रोजी सकाळीं ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत गुरुस्थान ठिकाणी रुद्राभिषेक झाला. १०-३० ते १२ पर्यंत संस्थान कीर्तनकार श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कालाकीर्तन झाले. दही हंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. भालचंद्र पेंढारकर मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर १० वाजता शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**हवापाणीः**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. मधून मधून थोडा थोडा पाऊस पडत असतो.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः—

**कीर्तन** :— १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची किर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) श्री. गंगाधर बुवा नरहरबुवा व्यास पुणे यांची गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तने झाली.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** :— १) श्री. बाळकृष्ण शर्मा. ग्वाल्हेर, २) सौ. सुमित्रा फडके ३) श्रीसाईबाबा सत्संग मंडळ सुरत. ४) श्री नमितासेन गुप्ता कलेक ५) श्री.

एम. आर. बाल सुब्रम्हण्यम. मद्रास. ६) श्री रामदास मोरे. पामना. ७) श्री. रामभाऊ हिंगले. पारगे. ८) श्री. शिरडी साईबाबा सोसायटी हैद्राबाद. ९) श्री. भजन मंडळ कछियाना जबलपूर. १०) श्री. राजीव आनंद मु. नीलो खेडी. ११) श्री. दत्तात्रय तुकाराम दयाळ. सातारा. १२) श्री. शरद दत्तात्रेय गोठीवरेकर. मुंबई. १३) श्री. रामानंद स्वामी हैद्राबाद. १४) सौ. सीता लक्ष्मी, पुणे. १५) ह. भ. प. आबाजी पणशीकर. मुंबई. १६) कु. विजया, मद्रास. १७) श्री. माधवराव ज्यानूजी दैठणकर पुणे. १८) श्री. तुकाराम महादेवराव दैठणकर, १९) श्री. अशोक महादेव दैठणकर, पुणे. २०) श्री. गोकूळ दगडोबा राहूरकर, पुणे. २१) श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर मुंबई. २२) डॉ. एम. के किर्तीकर, मुंबई. २३) श्री. श्याम राऊत, पुणे. २४) श्री. अशोक माधवराव दैठणकर, पुणे. २५) सौ. अनुराधा पौडवाल, मुंबई. २६) श्री. अरुण पौडवाल, मुंबई. २७) श्री. रवी दाते, मुंबई. २८) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. २९) कु. श्रीकला हतंगडी, मुंबई. ३०) श्री. मल्लेश, मुंबई. ३१) श्री. अनंत पांचाळ, मुंबई. ३२) श्री. अरविंद म्हात्रे, मुंबई. ३३) श्री. मनोहर कदम, मुंबई. ३४) श्री. गव्हाणकर यशवंत पांडुरंग, मुंबई. ३५) सौ. शीला कदम, मुंबई. ३६) श्री सुधाकर नारायण कामतेकर, ३७) श्री. अशोक अनंत करंगुरकर, मुंबई. ३८) श्री. मुकुंद जोग, मुंबई. ३९) श्री. शरद बी. गोरेगावकर, मुंबई. ४०) श्री. प्रभाकर महाले मुंबई. ४१) श्री. नारायण गद्रे, मुंबई. ४२) श्री. विलास मोहिते, मुंबई. ४३) श्री. बाळकृष्ण पगारे, मुंबई. ४४) श्री. विजय कामतेकर, ४५) श्री. रमेश पारकर, मुंबई. ४६) श्री. सुभाष नांदोसकर, मुंबई. ४७) कृष्णा कामतेकर, ४८) श्री. अशोक शेटये, मुंबई. ४९) श्रीमती वेदावती हैद्राबाद. ५०) श्री. ईश्वर रामनाथकर, मुंबई. ५१) श्री. परशुराम पालकर, मुंबई. ५२) श्री. अमोल घाटगे, कुलाबा. ५३) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर. ५४) श्री. नागेश गंगाधर भोईर, दिवाकर. ५५) श्री. मनोजकुमार नागेश दिवाकर. ५६) मास्तर अब्दूल कादर, निजामा. पुणे. ५७) श्री. आप्पा सामंत, मुंबई. ५८) कल्पना विश्वनाथ हैद्राबाद. ५९) एन. एल. कल्याणी पुणे. ६०) श्री. वाघचौरे पुणे. ६१) श्री. एम. एस. उपाध्याय, पुणे. ६२) श्यामसुंदर भेडा, संगमनेर. ६३) ज्योत्स्ना गोपाळराव भालेराव, कोपरगाव. ६४) किसनदास दगडू नगर. ६५) श्री. मुरलीधर दगडू गायकवाड, नगर. ६६) श्री. शिवराम बाबूराव बिडवे, संगमनेर. ६७) श्री. शशिकांत दत्तात्रय नांगरे, राहता. ६८) श्री. कुलकर्णी नितीन प्रभाकर राहाता. ६९) भागवत शैलेश वसंतराव, ठाणा. ७० सौ. सविता गिधरे, शिर्डी. ७१) श्री. रामा वसंत भागवत, ठाणा. ७२) श्री. प्रसाद श्रीकांत भट ठाणा. ७३) श्री. भोलानाथ रामनाथ समेळ, ७४) श्री. दिगंबरराव भातोंडे राहाता. ७५) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, सावळविहीर. ७६) श्री. राजकुमार

अंबादास बार्शीकर, नगर. ७७) शोभाताई राणे, मुंबई. ७८) श्री. ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिर्डी. ७९) श्री. दामू अण्णा दळवी, श्रीरामपूर. ८०) श्री. अशोक दामू अण्णा दळवी, श्रीरामपूर. ८१) श्री. वसंतराव दि. पवार, जळगाव. ८२) श्री. पुंडलीक जगूजी वाघ, येवला. ८३) श्री. ईश्वर पुंडलीक वाघ, येवला. ८४) सखाराम राघुजी गुरव, कोपरगाव. ८५) श्री. ज्ञानोबा रामचंद्र वैदय शिर्डी. ८६) श्री. सदाशिवराव जाधव, सांगली. ८७) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे. ८८) श्री. नरेश माहूरकर पुणे. ८९) सौ. प्रमिलाताई पैठणकर, नाशिक. ९०) शकुंतला मोरेश्वर जोशी, नाशिक. ९१) श्रीपाद शंकर साठे, पुणे. ९२) श्री. नामदेव गणपत शिंदे, दौंड. ९३) सुनिल रत्नपारखी नाशिक. ९४) श्री. आर. एच. लड्डा, श्रीरामपूर ९५) श्री. अजित जनार्दन कुलकर्णी, पुणे. ९६) कौशाबाई चिमनलाल चोपडा, शिर्डी. ९७) लीलावती गुजराथी, शिर्डी. ९८) श्री. राजेंद्र गंगाधर जाधव, पुणे. ९९) श्री. ईश्वर काशीनाथ उदागे, पुणे. १००) श्री. भीमराव साबेर, निमगाव खैरी. १०१) श्री. राजकुमार त्रिंबक चव्हाण, पुणे. १०२) श्री. वसंतराव देवळणकर, १०३) पद्माकर दत्तात्रय बिडवे, पुणे. १०४) श्री. महादेवराव तुपे, पुणे. १०५) ज्ञानोबा जगन्नाथ नगरकर पुणे. १०६) श्री. प्रसाद सुर्यकांत हुडे, पुणे. १०७) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे. १०८) श्री. दत्तात्रय दामोदर रासने. १०९) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. ११०) श्री. दिवेकर, पुणे. १११) श्री. वसंत पवार, पुणे. ११२) श्री. नागा साईबाबा मोतूर, आंध्रप्रदेश. ११३) श्री. नारायण जोगळेकर, उगार. ११४) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी, ११५) श्री गंगाधर जाधव, पुणे. ११६) श्री. मनोहर लोणकर, पुणे. ११७) श्री. रामचंद्र खळदकर, पुणे. ११८) श्री. शरदकुमार खळदकर, पुणे. ११९) श्री. श्याम खळदकर, पुणे. १२०) श्री. ज्ञानेश्वर नगरकर, पुणे. १२१) श्री. चंद्रकांत लोणकर, पुणे. १२२) श्री. वसंत कामतेकर, मुंबई. १२३) श्री. बारकूशेठ मांडवकर मुंबई. १२४) श्री. शशीकांत दळवी, मुंबई. १२५) प्रदिप सातर्डेकर, मुंबई. १२६) श्री. वसंत जोशी, मुंबई. १२७) श्री. विलास पावसकर, मुंबई. १२८) श्री. सत्यवान मालाडकर, मुंबई. १२९) श्री. विलास महाडिक, मुंबई. १३०) श्री. भाई मोरे, मुंबई. १३१) श्री. यशवंत नाईक, मुंबई. १३२) श्री. दत्तात्रय कदम, मुंबई. १३३) श्री. अण्णासाहेब कदम, मुंबई. १३४) श्री. सुरेश इर्लेकर, मुंबई. १३५) श्री. शशीकांत राऊत, मुंबई. १३६) श्री. रविंद्र तावडे, मुंबई. १३७) श्री. हरीश्चंद्र वाडगे, मुंबई. १३८) श्री. बबन वेलणकर, मुंबई. १३९) श्री. अनिल इंजिनीयरींग वर्क्स, शिर्डी. १४०) श्री. शांताराम रे, मिराणे १४१) श्री. भालचंद्र पेंढारकर, मुंबई. १४२) श्री. विश्वनाथ कान्हेरे, मुंबई. १४३) श्री. श्रीकांत देशपांडे, मुंबई. १४४) श्री. मधुकर बर्वे, मुंबई. १४५) श्री. प्रकाश वैद्य, मुंबई. १४६) श्रीमती विमल गायकवाड, मुंबई.